❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३२२ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



आता रुग्णवाहिकेतच मिळणार ICU दर्जाचे उपचार



भंडारा आणि अमरावती येथील रुग्णालयांमध्ये घडलेल्या आगीच्या दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने कडक पावले उचलली आहेत. अमरावती घटनेतील दोषी यंत्रणेवर कारवाई करण्यासोबतच संबंधित कंपनीला काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्यात आले आहे. तसेच, खाजगी आणि शासकीय रुग्णालयांमधील व्हेंटिलेटरच्या वापराबाबत स्वतंत्र कार्यप्रणाली (एसओपी) जाहीर करण्यात आली आहे. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी राज्यातील सर्व रुग्णालयांचे दरवर्षी 'फायर ऑडिट' करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्याच्या काटेकोर अंमलबजावणीची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली असल्याचे आबिटकर यांनी स्पष्ट केले.

■ नागपूर (दै. संध्या)

रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे वाहतूक कोंडीत अडकल्याने 20 महिन्यांच्या चिमुकल्याचा रुग्णवाहिकेतच मृत्यू झाल्याच्या हृदयद्रावक घटनेनंतर राज्य सरकारने आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. राज्यात येत्या 2 तारखेपासून अद्ययावत अशा 'हॉस्पिटल ऑन व्हील्स' संकल्पनेवर आधारित नव्या 108 रुग्णवाहिका सेवेचा शुभारंभ मुंबईतून केला जाणार असून, पहिल्या टप्प्यात 300 नव्या सुसज्ज रुग्णवाहिका ताफ्यात दाखल होणार आहेत, अशी माहिती राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. बुधवारी नागपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी राज्यातील रुग्णालयांचे वार्षिक फायर ऑडिट, नागपूर जिल्हा रुग्णालयाचे लोकार्पण, बोगस डॉक्टर प्रकरण आणि शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आरोग्य विभागाच्या उपाययोजनांवर सविस्तर भाष्य केले. अलिबागमधील दुर्दैवी घटनेवर तीव्र दुःख व्यक्त करताना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, 2013-14 च्या दरम्यान राज्यात 108 रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली होती. आता नव्या निविदा प्रक्रियेद्वारे ही सेवा अधिक अद्ययावत केली जात आहे. नव्या रुग्णवाहिकांमध्ये 'हॉस्पिटल ऑन व्हील्स' ही संकल्पना राबवली जाणार आहे. रुग्णवाहिकेत रुग्णाला घेतल्याक्षणीच तिथे आयसीयू बेडच्या धर्तीवर डॉक्टर्स आणि अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रणेमार्फत तात्काळ उपचार सुरू होतील. येत्या 2 तारखेला मुंबईत या अद्ययावत 108 सेवेच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण होणार असून, 300 नव्या रुग्णवाहिका सेवेत दाखल होतील. सार्वजनिक आरोग्य विभागाचे काम अधिक गतिमान करण्यासाठी राज्यभरात 'आरोग्य संवाद यात्रा' सुरू करण्यात आली असून, याअंतर्गत आपण वर्धा आणि भंडारा जिल्ह्यांच्या 2 दिवसीय दौऱ्यावर आलो आहोत. तसेच 'महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट'च्या संदर्भात डॉक्टरांसोबत महत्त्वाची बैठक घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर येथील मानकापूर परिसरात तयार झालेल्या जिल्हा रुग्णालयाचे लोकार्पण पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार आगामी विधिमंडळ अधिवेशनाच्या दरम्यान केले जाईल.

ऊसदराची बैठक रात्रीच!

तोडगा न निघाल्यास बेमुदत रेल रोको ते महामार्ग बंद, राजू शेट्टींचा इशारा

■ मुंबई (दै. संध्या)



ऊस दराच्या मुद्यावरुन सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी चांगलचे आक्रमक झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. कोणत्याही परिस्थितीत ऊसाला पहिली उचल 3 हजार 500 रुपये मिळालीच पाहिजे असा पवित्रा ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी घेतला आहे. 19 तारखेला म्हणजे उद्या 11 वाजता कारखानदारांसोबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांची बैठक होणार होती. मात्र, 19 तारखेला कारखानदारांसोबत होणारी बैठक रद्द झाली आहे. ही बैठक आजच रात्री 8 वाजता होणार असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, ऊसदराबाबत तोडगा निघाला नाहीतर पुढे काय? याबाबतचे आदेश राजू शेट्टींनी दिले आहेत. राजू शेट्टींनी दिलेल्या माहितीनुसार, सोलापूर ऊसदराची बैठक आज रात्रीच होणार आहे. यामध्ये तोडगा न निघाल्यास उद्यापासून बेमुदत रेल रोको आणि महामार्ग बंद करण्यात येणार असल्याचा इशारा राजू शेट्टींनी दिला आहे. उद्या (ता. 19) सकाळी 9 वाजता होणारी सोलापूर जिल्ह्यातील ऊसदराच्या तोडग्याची बैठक आज रात्री 9 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहे. दरम्यान, आज रात्री निर्णय न झाल्यास जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी सोलापूर रेल्वे स्थानकावर बेमुदत रेल रोको व सोलापूर जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीय महामार्ग बंद आंदोलन सुरु करायचे आहे. 16 नोव्हेंबरला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी आणि रासपचे प्रमुख महादेव जानकर यांच्या नेतृत्वात हजारो शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर निघाला होता. त्यानंतर सर्वच शेतकऱ्यांनी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच ठिय्या मांडला होता. 19 तारखेला बैठक होणार आहे, यामध्ये तोडगा काढू असे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मध्यरात्री 1 वाजता स्थगित करण्यात आले होते. मात्र, उद्या म्हणजे 19 तारखेला होणारी बैठक आजच होणार आहे. आज रात्री 8 वाजता पालकमंत्री जयकुमार गोरे हे सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांची बैठक घेणार आहेत. यामध्ये ऊसदराचा कंडका पडणार की नाही हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. दराचा प्रश्न निकाली नाही लागला तर राजू शेट्टींनी पुढचा मार्ग सांगितला आहे.

थोडक्यात...

छतावर अधिकारी अन् कर्मचाऱ्यांची ओली पार्टी

अमरावती : दैनिक संध्या

जिल्ह्यातील मोर्शी नगरपरिषदेच्या इमारतीच्या छतावर नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी आणि नगरसेवकांची रात्री मटण पार्टी रंगल्याप्रकरणी आता मुख्याधिकाऱ्यांवर कारवाईला जोर आला आहे. याप्रकरणाची जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडून गंभीर दखल घेण्यात आली होती, त्यानंतर आता मुख्याधिकारी पराग वानखडे यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. नगरपरिषदेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या ओल्या पार्टीचा ड्रोन व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर प्रकार समोर आला. त्यानंतर, संपूर्ण प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली, तसेच जिल्ह्यात या पार्टीचा चर्चा रंगली होती. राज्यात एकीकडे दुष्काळ असताना रात्री मटण पार्टी कशी रंगली? पार्टीला कोण अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते? याची माहिती घेतली जात असून एकंदरीत शासकीय कार्यालय संध्याकाळी बंद झालं असताना रात्री पार्टी रंगतेच कशी? असे अनेक प्रश्न या निमित्ताने विचारले जात असून विविध चर्चांना उधाण आलं. त्यामुळे, याप्रकरणी कारवाईला वेग आला आहे. मोर्शी नगर परिषदेच्या छतावरील ओल्या पार्टी प्रकरणी मुख्याधिकारी पराग वानखडे यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला. मोर्शी नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीत झालेल्या 'ओल्या पार्टी'च्या प्रकरणी मोर्शी नगर परिषदेचे मुख्याधिकारी पराग वानखडे यांना शासकीय सेवेतून निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी शासनाकडे सादर केला आहे.

ट्रम्प, पुतिन व जिनपिंग यांची डिनर भेट


शेन्झेन : दैनिक संध्या

APEC शिखर परिषदेच्या स्वागत मेजवानीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन एकत्र दिसून आले. या तीन नेत्यांची उद्या त्रिपक्षीय बैठक होणार आहे. यात इराणशी संबंधित संघर्ष आणि अणुशस्त्रांचा वापर यांसारख्या अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली जाईल. याआधी, शी जिनपिंग यांनी शिष्टाचाराचे नियम बाजूला ठेवून विमानतळावर ट्रम्प यांचे स्वागत केले. परदेशी नेत्याचे स्वागत करण्यासाठी स्वतः विमानतळावर जाण्याची त्यांची ही पहिलीच वेळ होती; सहसा हे काम इतर अधिकाऱ्यांमार्फत केले जाते. शी जिनपिंग यांनी ट्रम्प यांना सांगितले की, दोन्ही देशांमधील संवादातून संबंध सुधारतील आणि स्थिरता येईल, अशी त्यांना अपेक्षा आहे. चीनच्या सरकारी वृत्तसंस्थेनुसार, 'शिन्हुआ'ने दिलेल्या माहितीनुसार, शी यांनी म्हटले की, दोन्ही देशांनी एकमेकांचा आदर केला पाहिजे आणि मिळून काम केले पाहिजे.

दोन पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज, वचपा काढल्याचा दावा करणं चुकीचं

■ सातारा (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री मकरंद पाटील यांनी सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडीवर प्रतिक्रिया दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे संचालक उदयसिंह पाटील उंडाळकर यांची अध्यक्षपदी निवड झाली आहे. तर, व्हाईस चेअरमनपदावर शिवसेनेच्या दीपक चव्हाण यांची बिनविरोध निवड झाली आहे. या पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध पार पडली, यात कोणाचा वचपा काढला असा दावा करणे चुकीचे आहे, असं मकरंद पाटील यांनी म्हटलं. पहिल्या दिवसापासून आम्ही आणि शिवसेना एकत्र होतो. शिवेंद्रराजे भोसले, रामराजे नाईक निंबाळकर, शंभूराज देसाई आणि नितीन काका यांच्यासह आम्ही महायुती म्हणून यापूर्वी बसलेलो आहे. यासंदर्भात आमची मागणी वरिष्ठांकडे शिवेंद्रराजे भोसले यांच्या माध्यमातून मांडलेली आहे आणि त्यापद्धतीनं निर्णय झाला, असं मकरंद पाटील म्हणाले. स्थानिक पातळीवर चर्चा करून घेतलेला हा निर्णय शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्यापर्यंत पोहोचवला आणि वरिष्ठांच्या संमतीनेच निवडणूक पार पडली.



■ मकरंद पाटील म्हणाले महायुती म्हणून तिन्ही पक्ष एकत्र आल्यानं जिल्ह्यात चांगला संदेश गेला

उदयसिंह पाटील उंडाळकर यांच्या पक्षप्रवेशावेळी अजितदादा पवार यांनी दिलेला शब्द पाळत आज या अध्यक्ष निवडीच्या निमित्ताने त्यांना पक्षाच्या माध्यमातून योग्य तो न्याय देण्यात आला आहे, असं मकरंद पाटील यांनी म्हटलं. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेची अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाची निवडणूक अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात आणि बिनविरोध पार पडली. बँकेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादीचे उदयसिंह पाटील उंडाळकर आणि उपाध्यक्षपदी माजी आमदार दीपकराव चव्हाण यांची निवड झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना या महायुतीच्या तिन्ही घटक पक्षांनी एकत्र येऊन ही निवडणूक पार पाडली, ज्यामुळे जिल्ह्यात चांगला संदेश गेला आहे.

सरकार इंग्रजापेक्षा वाईट असा मेसेज जाऊ नये

सुधीर मुनगंटीवारांचा बैठकीत आग्रह, सरकारला घरचा आहेर

■ मुंबई (दै. संध्या)



विधिमंडळाच्या अधिवेशनात सातत्याने सरकारला घरचा अहेर देणारे आणि भाजपमध्ये काहीसे नाराज असलेल्या वरिष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा सरकारला घरचा अहेर दिला आहे. यंदाच्या हिवाळी अधिवेशनाचा कालावधी वाढवण्याची मागणी करत सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्याच सरकारला सवाल केला. आपलं सरकार इंग्रजापेक्षाही वाईट आहे असा मेसेज जायला नको, त्यासाठी अधिवेशनाचा कालावधी वाढवून घेत, स्वातंत्र्यवीर सावकर यांच्या भारतरत्न मागणीचा प्रस्ताव मंजूर करण्याची मागणी विविमंडळ कामकाज समितीच्या बैठकीत केली. मुनगंटीवार यांच्या या भूमिकेची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूरमध्ये असते, विदर्भातील प्रश्नांना प्राधान्य देत हे अधिवेशन नागपूरला घेतले जाते. त्याच पार्श्वभूमीवर आज विधिमंडळ कामकाज समितीची बैठक घेण्यात आली आहे. या बैठकीत सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारपुढे आपली मागणी आग्रहाने मांडली. मात्र, त्यांची मागणी मान्य झाली नसल्याचे दिसून आले. नेहमीप्रमाणे हिवाळी अधिवेशन 7 डिसेंबरला सुरू होईल, दोन आठवड्यांसाठीच्या कामकाजाला आज मान्यता देण्यात आली आहे. कामकाजामध्ये आवश्यक असेल तर अधिवेशन वाढवण्याच्या दृष्टीने विचार केला जाईल, अशी माहिती भाजप नेते तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. मात्र, विधिमंडळ कामकाज सल्लागार समिती बैठकीत मुनगंटीवारांचा आक्रमक पवित्रा पाहायला मिळाला. अधिवेशन दोनऐवजी तीन आठवड्यांचं घ्यावं, यासाठी सुधीर मुनगंटीवार यांनी आग्रह धरला होता. विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सुधीर मुनगंटीवार यांनी हिवाळी अधिवेशन दोन आठवड्यांऐवजी तीन किंवा चार आठवड्यांचं घ्यावं अशी मागणी केली. जर असं केलं नाही तर सावरकरांनासुद्धा न्याय मिळू शकत नाही, असे म्हणत सावरकर यांना भारतरत्न देण्यासंदर्भातील विषयाकडे सुधीर मुनगंटीवार यांनी लक्ष वेधले. तसेच, इंग्रजांपेक्षा आपलं सरकार वाईट आहे असा मेसेज जाऊ नये म्हणून अधिवेशन कालावधी वाढवून आपण स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भारतरत्न देण्याची मागणी करणारा प्रस्ताव देखील याच अधिवेशनात मंजूर करुन घ्यावा, अशी मागणी देखील सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. दरम्यान, दोन आठवड्यांचे अधिवेशन कामकाजासाठी कमी पडल्यास आणखी काही दिवस वाढवण्याचा निर्णय घेण्यासाठी कामकाज सल्लागार समितीची बैठक घेतली जाईल असं विधानसभा अध्यक्षांनी सांगितलं आहे.

धानाचा बोनस जाहीर करावा

दुष्काळात धानाच्या बोनसबाबत प्रश्न असेल तर त्यावर चर्चा केली जाईल. सरकारने धानाचा बोनस जाहीर केलेला नाही. त्यामुळे, विदर्भाच्या शेतकऱ्यांना धानाचा बोनस जाहीर करावा, अशी मागणी देखील सुधीर मुनगंटीवार यांनी केलीय.

शिवसैनिक बाळासाहेबांचा अपमान करू शकत नाही

शिवसेना प्रवक्त्यांनी बाळासाहेबांचा फोटो फाडल्याप्रकरणी एकनाथ शिंदेंची प्रतिक्रिया

■ मुंबई (दै. संध्या)



काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या बिलॉन्गिंगः अ जर्नी ऑफ लव्ह या पुस्तकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अवमानजनक उल्लेख केल्याचा आरोप करत शिंदेंच्या शिवसेना प्रवक्त्यांनी आज त्या पुस्तकातील दोन पानं फाडली. मात्र, याचवेळी, उद्धव ठाकरेंना ते पुस्तक भेट देत असल्याचाही फोटो फाडण्यात आला. त्यासोबतच, शिवसेनेच्या शायना एनसी यांच्याकडून बाळासाहेब आणि मणिशंकर अय्यर यांचा फोटो फाडण्यात आला. त्यामुळे, ठाकरेंच्या शिवसैनिकांनी संताप व्यक्त करत या घटनेचा निषेध केला आहे. बाळासाहेबांचा फोटो फाडल्यामुळे शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनीही तातडीने दखल घेत शायना एनसी यांना बोलावून घेतले होते. आता, याप्रकरणी त्यांनी भूमिका मांडली, तसेच बाळासाहेबांचा फोटो फाडला नसल्याचंही त्यांनी म्हटलं.

सोनिया गांधी यांच्या पुस्तकामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान केला गेला आहे, त्यामुळे या पुस्तकाचा निषेध करावा तेवढा कमी आहे. राहुल गांधी यांनी देखील सावरकरांचा अपमान केला, जाणीवपूर्वक अपमान केला आहे. वारंवार सावरकरांचा अपमान करणाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसण्याचं काम जे स्वत:ला हिंदुत्त्ववादी म्हणतात ते कसं काय करू शकतात. त्या पुस्तकातील दोन पानं स्वातंत्र्यवीर सावकराच्या विरोधातील आहेत, त्याबद्दल हे ब्र काढत नाहीत, त्याचा निषेध करत नाही. याउलट त्यांच्या गळ्यात गळे घालून बसतात, याचा आम्ही निषेध करतो, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी शिवसेना प्रवक्त्यांनी पुस्तक फाडल्याचं समर्थन करत नाव न घेता उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं.

स्वातंत्रवीर सावरकर यांनी या देशासाठी जे केलं ते सर्वश्रुत आहे. त्यामुळे, त्यांचा अपमान करणं ही बौद्धिक दिवाळखोरी नाही का, सावरकर यांचा अपमान तुम्ही वारंवार करणार ही बौद्धिक दिवाळखोरी नाही का? असा सवाल एकनाथ शिंदेंनी उपस्थित केला. जनतेनं या लोकांना तीनवेळा रिजेक्ट केले, बाळासाहेब यांचे विचार घेऊन आम्ही पुढे चाललो आहोत, असेही शिंदेंनी म्हटले. बाळासाहेब आमचे दैवत आहेत, कोणीही शिवसैनिक बाळासाहेबांचा अपमान करू शकत नाही. शायना एनसी यांनी फोटो फाडल्याप्रकरणी स्पष्टीकरण दिले आहे. त्यात बाळासाहेब हे मणीशंकर अय्यरला जोडे मारतानाचा फोटो आहे. शायना यांनी मणीशंकर अय्यर यांचा फोटो फाडला आहे, त्याचं तोंड फाडलेलं आहे, हे मला शायना एनसी यांनी दाखवलं. बाळासाहेबांचा अपमान शायना एनसी असू द्या नाहीतर कोणीही शिवसैनिक कदापी करू शकणार नाहीत. कारण, बाळासाहेब आमचं दैवत आहे, त्यांचे विचारच आम्ही पुढे घेऊन जात आहोत. त्यामुळेच, जनतेने आम्हाला स्वीकारले आहे, आम्ही त्यांची विचारधारा घेऊन पुढे चाललो आहे. मात्र, खोटे नाटे आरोप करून बदनाम करण्याचे हे काम करत आहेत. आता, त्यांच्याकडे काही नाही. लोकांनी त्यांना घरचा रस्ता दाखवला आहे, असे म्हणत नाव न घेता ठाकरेंच्या शिवसेनेवर एकनाथ शिंदेंनी टीका केली. तसेच, दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात दिला पाहिजे, असा सल्लाही ठाकरेंच्या शिवसेनेला दिला.

ठाकरेंवर टीका, २०१९चं पुन्हा काढलं

लोकांनी नाकारलं आहे. त्यामुळे खोटे आरोप करुन बदनाम करण्याचं काम करत आहेत. पब्लिक है सब जानती हैं. फोटोवरुन राजकारण सुरु आहे. लोकांनी त्यांना घरचा रस्ता दाखवला आहे. उगाच राजकारण करण्यापेक्षा शेतकऱ्यांना मदत करा. बाळासाहेब आमचं दैवत असून त्यांचा अवमान अशक्य आहे, असा पुनरुच्चार एकनाथ शिंदे यांनी केला, ते माध्यमांसोबत बोलत होते.

मंत्री छगन भुजबळांचा इशारा

■ मुंबई (दै. संध्या)

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या विरोधात जे चुकीचे स्टेटमेंट करतात, आरोप करतात अशांचा तिन्ही पक्ष एकवटून मुकाबला करणार असल्याचा इशारा मंत्री छगन भुजबळ यांनी दिला आहे. मर्यादा सोडून कोणी बोलत असेल तर प्रत्युत्तर देण्याचे काम तिन्ही पक्षाचे नेते आमदार कार्यकर्ते करतील असेही ते म्हणाले. आपसात एकमेकांविरेधात बोलायचं नाही. लोकशाहीच्या नावाखाली सगळेच खपून जाईल असं नाही असंही भुजबळ म्हणाले. ते मुंबईमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. नेहमी प्रमाणे समिती अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली आहे. दादा भुसे, हसन मुश्रीफ, गिरीश महाजन, मी उपस्थित होतो. पहिल्यांदा सर्व पक्षांनी आपल्या दुष्काळासंदर्भात काम करायचे आहे जलसंधारणाचे काम करायचे आहे. मनरेगा असेल, संकटातून शेतकऱ्यांना बाहेर कसं काढायचं यावर चर्चा झाल्याचे भुजबळ म्हणाले. तांत्रिक कारणांमुळं अग्रीम रक्कम गेली नसेल तर अडचण ताबडतोब दूर करायला पाहिजे. मदत कशी पोहोचेल यासंदर्भात काम करायचे आहे. लोकसहभाग देखील करायचा आहे. जिल्हा नियोजन समिती लवकर स्थापन करण्यासंदर्भात नावं द्यायची आहेत. डीपीडीपी संदर्भात लवकर सगळे कामाला लागतील असे ते म्हणाले. महामंडळ संदर्भात देखील अनेक कामं होऊ शकतात, अशात सभासद लवकरात लवकर नियुक्त करण्यासंदर्भात विचार करत आहोत. तिन्ही पक्षाचे नेते आहेत, त्यात आमदार, नेते, मंत्री यांनी एकमेकांविरोधात वावगं भाष्य करता कामा नये. अडचणी ज्या असतील त्या मुख्यमंत्री किंवा आपल्या नेत्यांकडे सांगा.

संपादकीय

मोबाईलची मगरमिठी

एकेकाळी दूरध्वनी. मोबाईल हे संपर्काचे साधन होते आज मोबाईल हे मनोरंजन, व्यवहार, शिक्षण, माहिती, नातेसंबंध, आणि विरंगुळ्यांचे केंद्र बनले आहे. तंत्रज्ञानाने माणसाचे जग जवळ आणलेले आहे परंतु त्याचवेळी माणसांमधील घराघरामधील प्रत्यक्ष संवाद मात्र दुर्मिळ केला आहे घरातील चार सदस्य एकत्र बसलेले असतात पण प्रत्येकाचे डोळे वेगवेगळे मोबाईलच्या पडद्यावर खेळलेले असतात एकाच घरात राहणारी माणसे एकमेकांशी बोलण्यापेक्षा सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तीशी अधिक वेळ संवाद साधतात ही आजच्या कुटुंब व्यवस्थेची विसंगती आहे भारतातील डिजिटल क्रांती किती वेगाने विस्तारली आहे, हे सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट होते. केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या मे २०२५ मधील सर्वेक्षणानुसार देशातील तब्बल ८५. ५ टक्के कुटुंबाकडे किमान एक तरी स्मार्ट फोन आहे. १५ ते २९ वयोगटातील ग्रामीण भागातील प्रत्येक माणसाकडे ९२. ७टक्के, तर शहरी भागातील ९५. ७ टक्के तरुणांनी मागील तीन महिन्यात इंटरनेटचा वापर केल्याचे नोंदवलेले आहे. इंटरनेट अँड मोबाईल असोसिएशनच्या अहवालानुसार २०२४ मध्ये देशातील इंटरनेट वापर करणाऱ्यांची संख्या ८८.६ कोटीवर पोहोचलेली आहे २०२५मध्ये ती साधारण ९० टक्क्याचे वर जाऊन पोहोचलेली आहे. लवकरच ही संख्या एक कोटीच्या वर जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मोबाईल व त्याच्या वापरा वरील जागतिक स्तरावरील संशोधनही चिंताजनक आहे.२०२४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका आंतरराष्ट्रीय संशोधनात २०१२ ते २०२२ या कालावधीत ९७७४८ व्यक्तींचा समावेश असलेल्या १०९ अभ्यास गटाचे विश्लेषण करण्यात आले, त्यामध्ये समस्यात्मक स्मार्टफोन वापराचे जागतिक प्रमाण ३७.१ टक्के आढळले. विशेष म्हणजे वाढत्या वयोगटांमध्येही अशा वापराचे प्रमाण वाढत असल्याचे संशोधनात नमूद करण्यात आलेले आहे.भारताची १८ ते ४० वयोगटातील १२२८६ प्रौढांचा समावेश असलेल्या दहा अभ्यासगटाच्या विश्लेषणात इंटरनेटच्या व्यसनाची कोणतीही पातळी आढळल्याचे एकत्रित प्रमाण ५८. ३४टक्के नोंदविण्यात आले. मात्र ही आकडेवारी संपूर्ण भारतीय लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. ही आकडेवारी मोबाईलचा वापर करणारा प्रत्येक व्यक्ती व्यसनाधीन आहे असे सिद्ध करत नाही. मात्र तंत्रज्ञानाच्या अतिवापराचा धोका किती व्यापक झाला आहे, याची कठोरपणे जाणीव करून देत आहे. छत्रपती संभाजी नगर मध्ये पंच्याहत्तरी पार केलेल्या एका आजीला इंस्टाग्राम वरील रिल्स पाहण्याचे इतके व्यसन जडले की कुटुंबीयांनी मोबाईल काढून घेतल्यावर त्यांची मानसिक अवस्था बिघडली. व त्या आजीना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली. पंधरा दिवसाचे उपचारानंतर त्यांची प्रकृती सुधारली, उपचार सुरू असताना रुग्णालयातील इतर रुग्णाचे मोबाईल त्यांनी उशीत लपवून ठेवल्याची घटना समोर आलेली आहे. प्रथमदर्शनी ही घटना विनोदी, किंवा आश्चर्यकारक वाटू शकते. मात्र तिच्या मुळाशी असलेला सामाजिक प्रश्न अत्यंत गंभीर आहे.मोबाईलचे व्यसन आता वय, शिक्षण, आर्थिक परिस्थिती, किंवा सामाजिक स्तर, याचे बंधन मानत नाही. लहान मुलांपासून जेष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येक वयोगटाला त्यांनी आपल्या विळख्यात घेतले आहे. मोबाईलच्या व्यसनामागे केवळ वापरकर्त्यांची ही इच्छाशक्ती कमी असणे, हे कारण नाही. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मची रचना वापरकर्त्यांना अधिकाधिक वेळ गुंतून ठेवणारी असते. सतत समोर येणाऱ्या नव्या रिल्स, आवडीचे व्हिडिओ, नोटिफिकेशन्स, लाईक, आणि कमेंट्स,या वापरकर्त्याला मोबाईल पुन्हा पुन्हा हातात घेण्याची सवय लावतात. एक व्हिडिओ पाहण्यासाठी केलेला प्रवास कधी कधी तासभर चालतो, किंवा तासभरापेक्षा जास्त वेळ चालतो, हेही मोबाईल वापरणाऱ्याच्या लक्षात येत नाही. लहान मुलांच्या बाबतीत ही समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर होत आहे, रडणाऱ्या मुलाला शांत करण्यासाठी, जेवण भरवण्यासाठी, किंवा पालकांना ऑफिसचे काम करता यावे म्हणून, त्याच्या हातात मोबाईल दिला जातो. सुरुवातीला सोयीचा वाटणारा हा उपाय पुढे सवय बनतो, हे पालकांच्याही लक्षात येत नाही. मैदानी खेळ, मित्र मंडळी सोबतचा संवाद, वाचन,चित्रकला,आणि कल्पनाशक्तीला चालना देणाऱ्या कृती या मोबाईलच्या वापरामुळे मागे पडत आहेत. मोबाईल मिळाला नाही तर लहान मुलामध्ये चिडचिड, हट्ट,आणि अस्वस्थता दिसू लागते. तरुणांमध्ये रील्स, गेमिंग, ऑनलाईन,मनोरंजन, आणि सतत सोशल मीडियावर सक्रिय राहण्याची स्पर्धा सुरू आहे. अभ्यास, नोकरी, व्यवसाय, आणि झोपेच्या वेळेवर याचा दूरगामी परिणाम होतो.दुसऱ्याचे आकर्षक, मोहक आयुष्य पाहून स्वतःच्या आयुष्याबद्दल निर्णय होत नाही व त्यामधून न्युनगंड निर्माण होणे, आभासी लोकप्रियतेच्या मागे धावणे, आणि प्रत्यक्ष नात्याकडे दुर्लक्ष करणे, हे त्याचे दुष्परिणाम आहेत.संभाजीनगर येथील आजीची घटना या समस्याचा वेगळा पैलू समोर आणते. मुलं नोकरी व्यवसायासाठी बाहेर, नातंवंडे शिक्षणात व्यस्त, आणि घरातील जेष्ठ व्यक्ती दिवसभर एकट्याचा असतात असे चित्र,अनेक कुटुंबामध्ये आहे. निवृत्तीनंतर कमी झालेल्या दिनक्रम, मित्रपरिवाराशी कमी झालेला संपर्क, आणि संवादाचा अभाव, यामुळे जेष्ठ नागरिक मोबाईल कडे वळलेले आहेत. धार्मिक प्रवचने, बातम्या,व्हाट्सअप, आणि याचा त्यांना विरंगुळा बनलेला असतो.त्या गैर काहीच काहीच नाही, पण मोबाईल हा माणसाच्या सहवासाचा पर्याय बनवू लागला तर अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. ज्येष्ठ मंडळीना मोबाईल वापर करून देऊ नये, असा या घटनेचा अर्थ नाही. उलट त्यांना डिजिटल साक्षर करणे, ऑनलाईन फसवणुकीपासून सावध करणे, आणि तंत्रज्ञाचा वापर कसा करणे हे शिकवणे महत्त्वाचे आहे, मात्र त्यांना वेळ देणे, त्यांच्या अडचणी ऐकणे, व त्या अडचणीतून मार्ग काढणे,याला पर्याय मोबाईल हा नाही?.... हे लक्षात घेतले पाहिजे. मोबाईलचे समस्येवर केवळ मोबाईल बंद करणे,हा त्यावरील उपाय नाही. आधुनिक जीवनात मोबाईलची गरज नाकारता येणार नाही, गरज आहे मोबाईल वापरावर नियंत्रण ठेवण्याची, आणि डिजिटल शिस्त निर्माण करण्याची आहे. याची जाणीव ठेवली पाहिजे. घरात आल्यानंतर घरातल्या मंडळींशी संवाद साधताना, जेवताना, मोबाईल बाजूला ठेवावा. लहान मुलांना वयानुसार स्क्रीन वापरण्याची मर्यादा घालावी, पालकांनी स्वतःच्या मोबाईल वापरावर नियंत्रण ठेवावे.मुलांना मैदानी खेळ, वाचन, कला आणि प्रत्यक्ष सामाजिक सहभागासाठी प्रोत्साहन द्यावे. ज्येष्ठ नागरिकांसाठी फिरणे, भजन, वाचन, मित्रमंडळींच्या भेटी, आणि सामूहिक उपक्रमाचे नियोजन करावे. शाळा आणि महाविद्यालयाने डिजिटल, व्यसन, सायबर सुरक्षितता,आणि मानसिक आरोग्य विषयी जनजागृती करावी. मोबाईल न मिळाल्यास तीव्र अस्वस्थता, झोपेचा अभाव, दैनंदिन कामावर परिणाम किंवा आक्रमक वर्तन, दिसत असल्यास मानसोपचार तज्ञाची मदत घ्यावी. अशा उपायोजनाचा प्रत्येकाने अवलंब करायला हवा. सरकारनेही डिजिटल व्यवसायाच्या वाढत्या समस्याकडे व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून पाहाण्याची नितांत गरज आहे. शाळांमध्ये समुपदेशन, पालकांसाठी मार्गदर्शन, आणि वेळ, मोबाईल व्यसनाच्या लक्षणाची ओळख करून देणाऱ्या मोहिमा राबविणे आवश्यक आहे. शेवटी प्रश्न मोबाईल चांगला आहे का हा नाही?प्रश्न हा आहे, मोबाईल हा आपल्या हातात आहे की?...आपण मोबाईलच्या हातात आहोत?... हा प्रश्न संभाजीनगर मधील आजीबाईची घटनेपुरता मर्यादित नाही, तो प्रत्येक घरासाठी धोक्याची घंटा आहे. मुलांच्या हातातून मोबाईल काढून घेण्यापूर्वी पालकांनी स्वतःच्या हातातील मोबाईलकडेही पाहणे आवश्यक आहे ज्येष्ठ मंडळींना मोबाईल पासून दूर करण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधून त्यांचा एकटेपणा दूर करण्याचा प्रयत्न करावा. कारण स्क्रीनवर हजारो चेहरे वेगवेगळ्या स्वरूपात दिसतात, परंतु ते दैनंदिन जीवनात कामाला येत नाही. संकटाच्या वेळी ह्या आभासी दुनियेतील कोणीही कामाला येत नाही,व मदतीला येत नाही, हे वास्तव आहे याची जाणीव प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे.मोबाईलच्या पडद्याआड माणुसकी हरवत चाललेली आहे. चिमुकल्यापासून जेष्ठा पर्यंत मोबाईलने मगरमिठी घातलेली आहे. सोशल मिडीयामुळे मानसिक आरोग्य, कौटुबिक संवाद. सामाजिक आरोग्य धोक्यात आणलेले आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.मोबाईलने जग जोडले, परंतु त्याने माणसाला माणसापासून तोडू नये हीच रास्त अपेक्षा आहे.

वन्दे मातरम् गीताच्या १५१ व्या जयंतीनिमित्त भारतमातेच्या दुर्मीळ चित्राचे दर्शन

राजा दिनकर केळकर संग्रहालयात विशेष कार्यक्रम; ५० वर्षांपूर्वीच्या मूळ चित्राला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ पुणे (दै. संध्या)


वन्दे मातरम् गीताच्या १५१ व्या जयंतीनिमित्त (कार्तिक शुद्ध नवमी) वन्दे मातरम् सार्धशती जयंती समारोह समिती आणि जन्मदा प्रतिष्ठान यांच्या वतीने मंगळवारी (दि. १८ नोव्हेंबर) राजा दिनकर केळकर संग्रहालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यानिमित्त संग्रहालयात जतन केलेल्या चित्रकार जी. भि. दीक्षित यांनी रेखाटलेल्या भारतमातेच्या दुर्मीळ मूळ चित्राचे विशेष प्रदर्शन व पूजन करण्यात आले. वन्दे मातरम् गीताच्या शताब्दी वर्षानिमित्त १९७५ मध्ये वन्दे मातरम्चे अभ्यासक अमरेंद्र गाडगीळ यांनी चित्रकार जी. भि. दीक्षित यांच्याकडून हे विशेष चित्र रेखाटून घेतले होते. तब्बल ५० वर्षांपूर्वी साकारलेल्या या ऐतिहासिक चित्राचे प्रदर्शन या विशेष दिनानिमित्त एक दिवसासाठी खुले ठेवण्यात आले होते.

भारतीय जनता पक्षाचे पुणे शहर सरचिटणीस दीपक नागपुरे आणि राजा दिनकर केळकर संग्रहालयाचे निर्देशक व विश्वस्त सुधन्वा रानडे यांच्या हस्ते भारतमातेच्या चित्राचे पूजन करण्यात आले. यावेळी गेल्या १५० वर्षांतील भारतीय चित्रकारांनी वन्दे मातरम् या गीताच्या प्रेरणेतून साकारलेली भारतमातेची पाच महत्त्वपूर्ण चित्रेही प्रदर्शित करण्यात आली.

कार्यक्रमात वन्दे मातरम् गीताच्या जन्माचा ऐतिहासिक प्रसंग प्रदीप फाटक आणि प्रसाद कुलकर्णी यांनी प्रभावी अभिवाचनातून सादर केला.

मिलिंद सबनीस यांनी प्रास्ताविक



केले, तर संजय भंडारे यांनी आभार मानले. या प्रसंगी शिरीष पटवर्धन, संजय भंडारे, संदर्भ ग्रंथपाल प्रसाद भडसावळे, प्रा. रवींद्र कोठावदे, विजय केळकर यांच्यासह अनेक मान्यवर व रसिक उपस्थित होते. राजा दिनकर केळकर संग्रहालयाचे निर्देशक व विश्वस्त सुधन्वा रानडे यांच्या विशेष सहकार्याने कार्यक्रमाचे संयोजन करण्यात आले. वन्दे मातरम् गीताच्या १५१ वर्षांच्या गौरवशाली प्रवासातील ऐतिहासिक आठवणींना उजाळा देणारा हा उपक्रम ठरला.

पाटस परिसरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट! यात्रा तोंडावर, यवत पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह?

चार दिवसांवर यात्रा येऊन ठेपली; अवैध धंद्यांना आळा घालण्याची नागरिकांची मागणी

■ पाटस (दै. संध्या)

दौंड तालुक्यातील पाटस परिसरात गेल्या कित्येक दिवसांपासून अवैध धंद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून, परिसरात हे धंदे मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. या अवैध धंद्यांवर नियंत्रण मिळवण्यात यवत पोलिस प्रशासनाला यश येत नसल्याची नाराजी नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, अवघ्या चार दिवसांवर पाटस येथील यात्रा येऊन ठेपली आहे. यात्रेच्या निमित्ताने परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविक, व्यापारी आणि नागरिकांची गर्दी होणार आहे. अशा परिस्थितीत अवैध धंद्यांवर वेळीच कारवाई न झाल्यास यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

यात्रा म्हटले की मोठी गर्दी, वाहतूक व्यवस्था, दुकाने आणि रात्री उशिरापर्यंत सुरू असलेली वर्दळ हे चित्र असते. मात्र, याच गर्दीचा फायदा घेत काही



समाजकंटकांकडून गैरप्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे यात्रेपूर्वीच पोलिस प्रशासनाने सतर्क होऊन अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

पाटस परिसरातील अवैध धंद्यांवर नेमकी कारवाई कधी होणार? यात्रेच्या काळात नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार? अवैध धंदे सुरू असल्याच्या तक्रारींची पोलिस प्रशासन दखल घेणार का? असे सवाल आता नागरिक उपस्थित करीत आहेत.

यवत पोलिस प्रशासनाने पाटस परिसरात विशेष गस्त वाढवावी, अवैध धंद्यांवर धडक कारवाई करावी, संशयित गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करावी आणि यात्रेच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी विशेष पोलिस बंदोबस्त तैनात करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

यात्रा आनंदात आणि शांततेत पार पडावी, यासाठी पोलिस प्रशासनाने केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कृतीतून आपली जबाबदारी पार पाडावी, अशी अपेक्षा पाटसकर नागरिक व्यक्त करीत आहेत.

कामगार विभागाच्या सेवा व योजनांची प्रक्रिया अधिक सुलभ होणार : मंत्री ॲड. आकाश फुंडकर

■ पुणे (दै. संध्या)

कामगार विभागाच्या २९ सेवा आणि १८ योजनांच्या शासकीय प्रक्रिया पुनर्रचनेस (जीपीआर) मान्यता देण्यात आली आहे. यामुळे कार्यालयीन फेऱ्या, अर्जातील रकाने, आवश्यक कागदपत्रे, मंजुरीचे स्तर आणि सेवा मंजुरीचा कालावधी कमी होणार आहे. या सेवा व योजनांसाठी तयार करण्यात येणारे पोर्टल नजीकच्या काळात कार्यान्वित केले जाईल. त्यामुळे नागरिक आणि व्यावसायिकांना लाभ होईल, असे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी सांगितले.

मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली २७ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या राज्यस्तरीय शासकीय प्रक्रिया पुनर्रचना समितीच्या बैठकीत कामगार विभागाच्या २९ जी-टू-बी व जी-टू-सी सेवा आणि १८ योजनांची प्रक्रिया पुनर्रचना अंतिम करण्यास सहमती देण्यात आली. त्यानुसार कामगार विभागाने १७ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे या



प्रक्रियेला मान्यता दिली आहे.

या पुनर्रचनेनुसार आवश्यक अर्ज, कागदपत्रे, मंजुरीचे स्तर तसेच अंतिम सेवा मान्यतेसाठीचे दाखले व प्रमाणपत्रांमध्ये आवश्यक बदल करण्यात आले आहेत. या सर्व सेवा व योजनांचा लाभ अधिक सुलभपणे देण्यासाठी स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात येत आहे.

महाराष्ट्र भूषणसह विविध राज्यस्तरीय पुरस्कारांच्या निवडीसंदर्भात बैठक

■ पुणे (दै. संध्या)

राज्य शासनाच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या विविध सांस्कृतिक व कलाक्षेत्रातील मानाच्या पुरस्कारांच्या निवडीसंदर्भात सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील दालनात बैठक पार पडली. या बैठकीत विविध पुरस्कारांसाठी गठित तज्ज्ञ समित्यांच्या सदस्यांशी पुरस्कारांच्या अनुषंगाने प्राथमिक चर्चा करण्यात आली.

तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार, भारतरत्न पं. भीमसेन जोशी जीवनगौरव पुरस्कार, ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार आणि संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार हे २०२५-२६ आणि २०२६-२७ या वर्षांसाठी देण्याबाबत चर्चा झाली.

तसेच गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार आणि स्वरसम्राज्ञी आशा भोसले पुरस्कार २०२६-२७ या वर्षासाठी देण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराच्या २०२५-२६ आणि २०२६-२७ या वर्षांच्या पुरस्कार निवडीसंदर्भातही प्राथमिक चर्चा करण्यात आली. या विविध पुरस्कारांसाठी प्रत्येकी १० लाख रुपये रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह, तर महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी २५ लाख रुपये रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

बैठकीस सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर, कार्यक्रम अधिकारी निलेश धुमाळ आणि मिलिंद बिर्जे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी तसेच विविध पुरस्कारांसाठी गठित तज्ज्ञ समित्यांचे सदस्य उपस्थित होते.

'राजा शिवछत्रपती' भव्य रंगावली प्रदर्शनातून उलगडणार शिवचरित्रातील प्रेरणादायी प्रसंग

■ पुणे (दै. संध्या)

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग आणि ऐतिहासिक कार्याचा कलात्मक आविष्कार रंगावलीच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. शारदा अवसरे आणि सहकलाकार यांच्या वतीने 'राजा शिव छत्रपती' या भव्य रंगावली प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २१ ते २४ नोव्हेंबरदरम्यान कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात हे प्रदर्शन होणार आहे.

दररोज सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत प्रदर्शन पाहता येणार असून, प्रवेश विनामूल्य आहे. श्रीरंग कलादर्पण फाउंडेशन, पुणे तर्फे प्रा. अक्षय शहापूरकर यांचे या उपक्रमाला मार्गदर्शन लाभले आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि भारत इतिहास संशोधक मंडळाचे सचिव पांडुरंग बलकवडे यांच्या



हस्ते होणार आहे. यावेळी शिवजयंती महोत्सव समिती, पुणेचे प्रवर्तक व संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तसेच रंगावलीकार अक्षय शहापूरकर आणि अनिल निवृत्ती पवार यांची उपस्थिती असणार आहे.

प्रदर्शनाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.

२१ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता नाशिक येथील राजेश पाटील यांचे फलक रेखाटन होणार आहे. २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत अक्षय शहापूरकर यांचे छत्रपती शिवाजी महाराज या विषयावर व्याख्यान होईल. तर २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत भूषण शिंदे व सहकलाकारांचे बासरी वादन व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य रंगावलीच्या माध्यमातून जाणून घेण्यासाठी आणि कलाकारांच्या कलेचा अनुभव घेण्यासाठी पुणेकरांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

पनवेल महापालिकेसाठी स्वतंत्र 'अतिरिक्त जिल्हा निबंधक' नियुक्त करा

खासदार श्रीरंग बारणे यांची भारताच्या महानिबंधकांकडे मागणी

■ पुणे (दै. संध्या)

पनवेल महापालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या आणि जन्म-मृत्यू नोंदणीच्या कामात होणारा विलंब टाळण्यासाठी, पनवेल महापालिका क्षेत्राकरिता स्वतंत्र 'अतिरिक्त जिल्हा निबंधक' म्हणून वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांची तातडीने नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी भारताच्या महानिबंधकांकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी दिल्ली येथील केंद्रीय कार्यालयाला सविस्तर पत्र पाठवून लक्ष वेधले आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या पनवेल महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या सध्या अंदाजे १० लाखांच्या घरात पोहोचली आहे. महापालिका हद्दीत सुमारे २२९ रुग्णालये कार्यरत असून, चार प्रशासकीय प्रभागांमधून जन्म व मृत्यू नोंदणीसंदर्भातील हजारो अर्ज नियमितपणे प्राप्त होत असतात. सध्या नागरिकांकडून जुन्या जन्म-मृत्यू नोंदी मिळविण्यासाठी तसेच विलंबाने होणाऱ्या नोंदींसाठी मोठ्या संख्येने अर्ज येत आहेत.



नियमांनुसार, या अर्जाची 'सीआरएस' पोर्टलवर नोंदणी करून अतिरिक्त जिल्हा निबंधक यांची मंजुरी घेणे बंधनकारक असते. मात्र, सध्या संपूर्ण रायगड जिल्ह्यातील जन्म व मृत्यू नोंदणीच्या अर्जाची छाननी व मंजुरीची जबाबदारी एकाच अधिकाऱ्यावर असल्यामुळे मंजुरी प्रक्रियेला मोठा विलंब होत आहे. परिणामी, विविध शासकीय, प्रशासकीय आणि कायदेशीर कामांसाठी हे दाखले अत्यावश्यक असलेल्या सामान्य नागरिकांना विनाकारण मनस्ताप व गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

पनवेल क्षेत्राचा वाढता आवाका आणि कामाचा प्रचंड ताण लक्षात घेता, पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांची पनवेल

क्षेत्रासाठी अतिरिक्त जिल्हा निबंधक (जन्म व मृत्यू) म्हणून स्वतंत्र नियुक्ती करावी, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली आहे. ही नियुक्ती झाल्यास कागदपत्रे व दाखले मंजुरीची प्रक्रिया अत्यंत जलद होईल आणि नागरिकांना वेळेत आवश्यक प्रमाणपत्रे मिळण्याचा मार्ग सुकर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



‘कोपा मॉल’तर्फे ‘गॉरमेट कॉफी फेस्टिव्हल’च्या माध्यमातून पुण्याच्या कॉफी संस्कृतीचा अनोखा उत्सव

पुणे : दैनिक संध्या

कोरेगाव पार्क येथील पुण्यातील आघाडीचे लाइफस्टाइल आणि डायनिंग डेस्टिनेशन असलेले कोपा मॉल (KOPA Mall) येथे २१ आणि २२ नोव्हेंबर रोजी ‘गॉरमेट कॉफी फेस्टिव्हल’चे आयोजन करण्यात येणार आहे. कॉफी, सर्जनशीलता आणि संस्कृतीचा उत्सव साजरा करणारा हा दोन दिवसीय महोत्सव कॉफीप्रेमी, खाद्यप्रेमी आणि शहरातील नागरिकांसाठी एक खास अनुभव घेऊन येणार आहे. या फेस्टिव्हलमध्ये स्पेशालिटी कॉफी ब्रँड्स, आर्टिसनल कॉफी, रुचकर खाद्यपदार्थ, लाइव्ह म्युझिक, संवादात्मक कार्यशाळा आणि विविध सर्जनशील उपक्रमांचा समावेश असेल. नेहमीच्या कॅफे अनुभवापलीकडे जाऊन कॉफीच्या वैविध्यपूर्ण जगाचा शोध घेण्याची संधी या माध्यमातून अभ्यागतांना मिळणार आहे. आर्टिसनल कॉफी ब्रँड्स, स्पेशालिटी कॉफी रोस्टर्स आणि लोकप्रिय कॅफे यांना एकाच व्यासपीठावर आणणारा हा महोत्सव अभ्यागतांना वेगवेगळे कॉफी ब्लेंड्स, नवे स्वाद आणि कॉफी बनवण्याच्या कलेचा अनुभव घेण्याची संधी देईल. ताज्या तयार केलेल्या कॉफीपासून ते आकर्षक पेयप्रकार, स्वादिष्ट डेझर्ट्स आणि गॉरमेट खाद्यपदार्थांपर्यंत, कॉफीची विविधता आणि बदलती संस्कृती या महोत्सवातून साजरी केली जाणार आहे. या अनुभवात आणखी रंगत आणण्यासाठी अभ्यागतांना संवादात्मक कॉफी कार्यशाळांमध्ये सहभागी होता येईल, क्रिएटिव्ह आर्ट कॉर्नर्सचा आनंद घेता येईल आणि लाइव्ह म्युझिकचा आस्वाद घेता येईल. या सर्व उपक्रमांमुळे खाद्यसंस्कृती, मनोरंजन आणि सामुदायिक सहभाग यांचा सुरेख संगम अनुभवता येईल. आपल्या आवडीची नवी कॉफी शोधणे असो, कॉफीचे विविध स्वाद अनुभवणे असो किंवा मित्रपरिवार आणि कुटुंबीयांसोबत निवांत वेळ घालवणे असो, हा महोत्सव कॉफीप्रेमींसह एक वेगळा वीकेंड अनुभवू इच्छिणाऱ्या सर्वांसाठी खास ठरणार आहे. स्पेशालिटी कॉफी, खाद्यपदार्थ, संगीत आणि सर्जनशील उपक्रम यांच्या अनोख्या संगमातून ‘गॉरमेट कॉफी फेस्टिव्हल’ एक उत्साही सामाजिक अनुभव निर्माण करण्याचा प्रयत्न करणार आहे. येथे अभ्यागतांना एकमेकांशी जोडले जाण्याची, नवनवीन गोष्टी अनुभवण्याची आणि कॉफीविषयीच्या आपल्या समान आवडीचा आनंद साजरा करण्याची संधी मिळेल. हा महोत्सव २१ आणि २२ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून कोपा मॉल, कोरेगाव पार्क, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. सर्व वयोगटांतील अभ्यागतांसाठी खुल्या असलेल्या या महोत्सवाची तिकिटे BookMyShow वर उपलब्ध आहेत.

जीआरपीच्या समन्वयातून १७ वर्षीय अल्पवयीन मुलीची सुरक्षित सुटका

पुणे : दैनिक संध्या

दादर रेल्वे स्थानकावर चाइल्ड हेल्पलाइन, मुंबई शहर आणि रेल्वे चिल्ड्रेन इंडिया यांच्या पथकाने रेल्वे पोलीस (जीआरपी) यांच्या समन्वयाने तातडीने कार्यवाही करत १७ वर्षीय अल्पवयीन मुलीची सुरक्षित सुटका करून तिला बाल संरक्षण यंत्रणेच्या स्वाधीन केले, अशी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी दिली आहे. मुलीच्या सुरक्षेच्या दृष्टीने तिला बालगृहात दाखल करण्यात आले आहे. पत्रकात दिलेल्या माहितीनुसार दादर रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना मानवी तस्करीविरोधी पथकाकडून संबंधित मुलीबाबत माहिती प्राप्त झाली होती. त्याचप्रमाणे, रेल्वे सुरक्षा दलाला देखील रेल मदद पोर्टलच्या माध्यमातून यासंदर्भात संदेश प्राप्त झाला होता. मुलीची सुरक्षितता लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल कदम यांनी ही माहिती चाइल्ड हेल्प लाईन आणि रेल्वे चिल्ड्रेन इंडिया यांच्या पथकासोबत सामायिक केली. माहिती मिळताच चाइल्ड हेल्पलाइन आणि रेल्वे चिल्ड्रेन इंडिया यांच्या पथकाने तातडीने ऑनलाइन समन्वय बैठक घेऊन पुढील कार्यवाहीचे नियोजन केले. त्यानंतर दादर रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक १३/१४ येथे प्रत्यक्ष भेट देऊन (आउटरीच) मुलीची ओळख पटविण्यात आली. चाइल्ड हेल्पलाइन आणि जीआरपी यांच्या संयुक्त सहकार्याने मुलीला सुरक्षित ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक संवादादरम्यान मुलीने ती छत्तीसगड राज्यातील दुर्ग जिल्ह्याची रहिवासी असून इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत असल्याचे सांगितले. सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्कात आलेल्या एका परिचित व्यक्तीला भेटण्यासाठी ती मुंबई येथे आली होती. मुलगी अल्पवयीन असल्याने तिचे वय, सुरक्षितता आणि संरक्षणाची गरज लक्षात घेऊन आवश्यक बाल संरक्षण प्रक्रिया राबविण्यात आली. जीआरपी पोलीस ठाण्यात आवश्यक कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर मुलीची जेजे रुग्णालयात प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यानंतर तिची सुरक्षितता, निवास, देखभाल आणि संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी बाल कल्याण समितीच्या प्रक्रियेनुसार तिला सुखरूप बालगृहात दाखल करण्यात आले.

‘हरित सेतू’ची संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषदेत दखल

पुणे : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने प्राधिकरण, निगडी येथे राबविण्यात येत असलेल्या हरित सेतू या पर्यावरणपूरक उपक्रमाची संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदलविषयक आंतरराष्ट्रीय परिषदेत दखल घेण्यात आली आहे. शहराच्या पर्यावरण संवर्धनासाठी महापालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या हरित सेतू उपक्रमाची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली आहे. ती शहरासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. तुर्कीये येथील अंटाल्या शहरातील अंटाल्या एक्स्पो सेंटर येथे 9 ते 20 नोव्हेंबर या कालावधीत आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. परिषदेत 14 नोव्हेंबरला हरित सेतू प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. जागतिक स्तरावर हवामान बदलाचे वाढते आव्हान, पर्यावरणाचे संवर्धन व शाश्वत विकास या विषयांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर जगभरातील विविध देश, संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था पर्यावरणपूरक विकासासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत. या आंतरराष्ट्रीय परिषदेतही अशा विविध उपक्रमांचे सादरीकरण व त्यावर चर्चा करण्यात येत आहे. युरोपमध्ये सुरू असलेल्या विविध कार्यक्रमांमध्येही हरित सेतू प्रकल्पाची चर्चा करण्यात आली. भारतामध्ये जगाला हेवा वाटावा असे अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जात असून, पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात पिंपरी चिंचवड महापालिकेनेही पुढाकार घेतल्याचा उल्लेख करण्यात आला. त्यामुळे स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या पर्यावरणपूरक प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडण्याची संधी मिळाली आहे. हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाताना स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. महापालिकेच्या हरित सेतू प्रकल्पाला मिळालेली आंतरराष्ट्रीय स्तरावरील दखल ही शहराच्या पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांना मिळालेली नवी ओळख आहे. शाश्वत व पर्यावरणपूरक शहराच्या दिशेने सुरू असलेल्या वाटचालीसाठी ती प्रेरणादायी ठरणार आहे, असे महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाचे सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड यांनी सांगितले.

कुबोटाचे माजी एमडी जी. एस. ग्रेवाल यांच्या नव्या पुस्तकातून उलगडली यशाची ११ अलिखित सूत्रे”


■ पुणे (दै. संध्या)

ट्रॅक्टर अँड मेकॅनायझेशन असोसिएशन (TMA) चे अध्यक्ष, एस्कॉर्ट्स कुबोटा लिमिटेडचे मुख्य सल्लागार आणि कुबोटाॲग्रिकल्चरल मशिनरी इंडियाचे माजी व्यवस्थापकीय संचालक जी. एस. ग्रेवाल यांचे ‘The 11 Unwritten Rules of Career Growth’ हे नवेपुस्तक प्रकाशित झाले आहे. हे पुस्तक आता ॲमेझॉनवर उपलब्ध आहे. ३६ वर्षांहून अधिक काळाच्या कॉर्पोरेट आणि नेतृत्व क्षेत्रातील अनुभवावर आधारित हे पुस्तक एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करते. अनेक बुद्धिमान, मेहनती आणि कार्यक्षम व्यावसायिक आपल्या करिअरमध्ये अपेक्षित प्रगती का करू शकत नाहीत, तर काही जण सातत्याने पुढे कसे जातात?

ग्रेवाल यांच्या मते, करिअरमधील यश केवळ शैक्षणिक पात्रता, तांत्रिक कौशल्य किंवा कठोर परिश्रमांवर अवलंबून नसते. त्यासाठी काही अलिखितनियम महत्त्वाची भूमिका बजावतात. हे नियम महाविद्यालयांमध्ये शिकवले जात नाहीत किंवा नोकरीच्या जबाबदाऱ्यांमध्ये स्पष्टपणे नमूद केलेले नसतात.

या पुस्तकात करिअरच्या प्रगतीशी संबंधित ११ महत्त्वाच्या सूत्रांची सोप्या आणि व्यावहारिक पद्धतीने मांडणी करण्यात आली आहे. यामध्ये सातत्यानेनवीन गोष्टी शिकणे, करिअरची स्पष्ट उद्दिष्टे निश्चित करणे, तांत्रिक कौशल्यांपलीकडे स्वतःच्या क्षमता विकसित करणे, प्रभावी संवादकौशल्य,सकारात्मक दृष्टिकोन, बदल स्वीकारण्याची तयारी, कोचिंग आणि मार्गदर्शन, नावीन्यपूर्ण विचार, व्यावसायिक संबंध निर्माण करणे, कामाच्या ठिकाणी योग्य वर्तन आणि स्वतःची व्यावसायिक ओळख निर्माण करणे यांचा समावेश आहे.

या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये केवळ सैद्धांतिक सल्ले नसून लेखकाच्या प्रदीर्घ व्यावसायिक प्रवासातील प्रत्यक्ष अनुभव, नेतृत्वातील निरीक्षणेआणि वास्तविक उदाहरणांचा समावेश आहे. पुस्तकात दिलेली व्यावहारिक मार्गदर्शक तत्त्वे आणि आत्मपरीक्षणासाठीचे उपक्रम वाचकांना स्वतःच्याक्षमता ओळखण्यास, सुधारणा करण्यास आणि करिअरच्या विकासाची जबाबदारी स्वतः स्वीकारण्यास मदत करतात. पुस्तक लिहिण्यामागील प्रेरणेबद्दल जी. एस. ग्रेवाल म्हणाले:“माझ्या प्रदीर्घ व्यावसायिक प्रवासात मला अनेक



प्रतिभावान आणि मेहनतीव्यक्तींसोबत काम करण्याची संधी मिळाली. या काळात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की केवळ उत्तम कामगिरी आणि तांत्रिक ज्ञान असूनही प्रत्येकालाकरिअरमध्ये अपेक्षित प्रगती करता येत नाही. सातत्याने शिकण्याची वृत्ती, प्रभावी संवाद, इतरांशी चांगले संबंध निर्माण करणे, आव्हानांकडे पाहण्याचादृष्टिकोन आणि मोठ्या जबाबदाऱ्यांसाठी स्वतःला तयार करणे या गोष्टीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत.या पुस्तकाच्या माध्यमातून मला असे अनुभव आणि शिकवण इतरांपर्यंत पोहोचवायची आहे, जी आपल्याला अनेकदा वर्षानुवर्षांच्या अनुभवातून आणिकधीकधी स्वतःच्या चुकांमधून मिळते. या पुस्तकामुळे काही व्यावसायिकांना जरी त्यांच्या करिअरमध्ये योग्य निर्णय घेण्यास मदत झाली, तरी माझाप्रयत्न सार्थकी लागेल.” हे पुस्तक विशेषतः करिअरच्या सुरुवातीच्या आणि मधल्या टप्प्यात असलेल्या व्यावसायिकांसाठी, तरुण व्यवस्थापकांसाठी आणि भविष्यातनेतृत्वाच्या जबाबदाऱ्या स्वीकारू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी उपयुक्त आहे. पुस्तकात करिअरमधील यशाचा अर्थ केवळ पदोन्नती, उच्च पद किंवा अधिक वेतन एवढाच मर्यादित नसल्याचेही अधोरेखित करण्यात आले आहे. दीर्घकालीन यशासाठी क्षमता, चारित्र्य, विश्वासार्हता, चांगले संबंध आणि वैयक्तिक समाधान यांचा समतोल साधणे आवश्यक असल्याचे लेखकानेस्पष्ट केले आहे. पुस्तकाची माहिती पुस्तकाचे नाव: The 11 Unwritten Rules of Career Growth लेखक: जी. एस. ग्रेवाल विषय: करिअर विकास, नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व विकास पृष्ठसंख्या: २७२ स्वरूप: पेपरबॅक उपलब्धता: ॲमेझॉन इंडिया.

लेखकाविषयी

जी. एस. ग्रेवाल हे सध्या ट्रॅक्टर अँड मेकॅनायझेशन असोसिएशन (TMA) चे अध्यक्ष आणि एस्कॉर्ट्स कुबोटा लिमिटेडचे मुख्य सल्लागार आहेत. यापूर्वी त्यांनी कुबोटा ॲग्रिकल्चरल मशिनरी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक तसेच कुबोटा इंडियाच्या संचालक मंडळाचे सदस्य म्हणून काम पाहिलेआहे. ट्रॅक्टर आणि कृषी यंत्रसामग्री उद्योगात त्यांना ३६ वर्षांहून अधिक अनुभव आहे. आपल्या कारकिर्दीत त्यांनी विक्री, विपणन, डीलर नेटवर्क विकास,ग्राहक सेवा आणि व्यवसाय व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांमध्ये वरिष्ठ नेतृत्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. नेतृत्व विकास, कोचिंग आणि मेंटरिंग या विषयांमध्ये त्यांना विशेष रस आहे. ‘Leader as a Coach’ हे त्यांचे नेतृत्व विकासावर आधारित यापूर्वीप्रकाशित झालेले पुस्तक आहे.



सदगुरू शंकर महाराज पालखी सोहळा संपन्न

■ पुणे (दै. संध्या)

श्री शंकर महाराज अन्नछत्र समिती ट्रस्ट, धनछवडी पुणे यांच्या संयोजनाने " सदगुरू शंकर महाराज यांच्या प्रकटदिन दिनानिमित्त " शंकरबाबा महाराज " पायी पालखी सोहळ्यचे " आयोजन करण्यात आले..

या पायी पालखीसोहळ्याच्या निमित्ताने धनकवडी, बालाजीनगर व आंबेगाव पठार, चव्हाण नगर, पदमावती या परिसरात नगरप्रदक्षिणा चे आयोजन करण्यात पायी पालखी सोहळ्यात करण्यात आले..... हा पायी पालखी सोहळ्याचे संपूर्ण आयोजन करण्यासाठी श्री शंकर महाराज अन्नछत्र समिती ट्रस्ट चे अध्यक्ष राजाभाऊ रेवडे, व सर्वश्री पदाधिकारी प्रशांत सूर्यवंशी,निलेश कोटकर , प्रविण बापू पासकर, निखिल उर्फ बाबू वाघमारे आणि अविनाश रेवडे, सचिन शिंदे या अथक परिश्रम घेतले..... या पालखी सोहळ्यासाठी आमदार भिमराव तापकीर, नगरसेवक गौरव घुले, सुहास रानवडे-पाटील,मनोज देशपांडे, युवराज बेलदरे, रोहिदास बापू चोरगे, ओंकार धनकवडे, मयूर आहेर - पाटील, नगरसेवक अजय खेडेकर हे मान्यवर उपस्थित होते.... या पायी पालखी सोहळ्याची सुरूवात श्री सदगुरू शंकर महाराज समाधी मठात महाराज



यांच्या पादुकांचे व विणा पूजन करून करण्यात आली , या पालखी सोहळ्यात पालखीचे बालाजीनगर, धनकवडी गाव, आंबेगाव पठार,चव्हाण नगर, पदमावती या भागात जागोजागी रांगोळी पायघड्या, भक्तगण यांस अन्नदान करत स्वागत करण्यात आले..... या पालखी सोहळ्या निमित्त श्री शंकर महाराज अन्नछत्र समिती समिती ट्रस्ट आयोजित " महाप्रसाद " चा शंकरबाबामय आनंद दुपारी १२ ते रात्रौ १२ पर्यंत ५० ते ६० हजार भक्तगण भाविकांनी घेतला महाप्रसाद व पायी सोहळ्यात " जय शंकर...जय शंकर आणि स्वामी समर्थ महाराज की जय व चिले महाराज की जय " असा नामघोषा करीत सोहळ्याचा आनंद घेतला.

अर्थशॉट प्राईजच्या अंतिम स्पर्धकांशी वेल्सचे राजकुमार विल्यम यांचा संवाद

■ पुणे (दै. संध्या)

वेल्सचे राजकुमार विल्यम आणि राजकुमारी कॅथरिन यांनी आज वांद्रे रिक्लेमेशन गार्डन येथे 'अर्थशॉट प्राईज २०२६' च्या अंतिम फेरीतील स्पर्धकांची भेट घेतली. शाश्वतता, नागरी गतिशीलता आणि स्वच्छ पर्यावरणाशी संबंधित उपक्रमांची माहिती घेऊन त्यांनी स्पर्धकांशी संवाद साधला. भूतानचे राजे वांगचुक आणि राणी जेत्सून यावेळी उपस्थित होते.



यावेळी राजकुमार विल्यम यांनी भारतातील दोन अंतिम स्पर्धकांपैकी एक असलेल्या महिंद्रा लास्ट माईल मोबिलिटीचे इलेक्ट्रिक तीनचाकी वाहन चालवून स्वच्छ नागरी वाहतुकीच्या भारतीय नवकल्पनेचा अनुभव घेतला. भारताच्या महिंद्रा लास्ट माईल मोबिलिटी आणि महिला हाउसिंग ट्रस्ट या दोन संस्थांनी स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. महिंद्रा लास्ट माईल मोबिलिटी स्वच्छ नागरी वाहतुकीला चालना देत असून, महिला हाउसिंग ट्रस्ट समुदायाच्या सहभागातून हवामान बदलाला तोंड देण्याची क्षमता वाढविणारे उपाय विकसित करीत आहे.

‘अर्थशॉट प्राइज’ पुरस्कार सोहळ्याचे यजमानपद भारत भूषवित आहे. अर्थशॉट प्राईजच्या अंतिम फेरीतील विजेत्यांना वांद्रे-कुर्ला संकुलातील जिओ कन्व्हेंशन सेंटर येथे होणाऱ्या कार्यक्रमात पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

समान नागरी कायद्याबाबत कोकण विभागात २१ नोव्हेंबरला जनसुनावणी

■ पुणे(दै. संध्या)

समान नागरी कायद्याबाबत (यूसीसी) नागरिकांचे विचार आणि मते जाणून घेण्यासाठी कोकण विभागात विभागीय स्तरावर जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखालील समिती महाराष्ट्रात महसूल विभागनिहाय हो जनसुनावणी घेत आहे.

कोकण महसूल विभागांतर्गत मुंबई शहर जिल्ह्यासाठी शनिवार, २१ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या वेळेत नियोजन हॉल, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर (जुने जकात घर, फोर्ट, मुंबई) येथे विशेष जनसुनावणी होणार आहे ही समिती कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील विभागीय आयुक्त कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहणार असून, तेथे येणाऱ्या नागरिकांची सुनावणी थेट समितीसमोर होईल. जे नागरिक नवी मुंबई येथे प्रत्यक्ष जाऊ शकणार नाहीत, त्यांनी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयात निर्धारित वेळेच्या एक तास आधी उपस्थित राहावे, तेथून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्यांची सुनावणी घेतली जाईल. या जनसुनावणीमध्ये विवाह, घटस्फोट, सहजीवन नातेसंबंध, भरण-पोषण, पालकत्व, वारसाहक्क आणि उत्तराधिकारी हक्क या प्रमुख विषयांवर नागरिकांची मते जाणून घेतली जाणार आहेत. ज्या नागरिकांना सुनावणीस प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नाही, ते www.ucc.maharashtra.gov.in या समान नागरी कायदा पोर्टलवर ३७ मुद्द्यांच्या आधारे आपली मते आणि माहिती ऑनलाइन पद्धतीने सादर करू शकतात.

वैद्यकीय महाविद्यालयासह अन्य विकासकामांनाही गती द्यावी : मुख्यमंत्री फडणवीस

■ पुणे (दै. संध्या)

गडचिरोलीसारख्या दुर्गम व आदिवासीबहुल जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालय, राष्ट्रीय महामार्ग आणि अन्य विकासकामे अनावश्यक वन्यजीव परवानग्यांच्या अटींमुळे प्रलंबित राहू नयेत. प्रत्यक्ष व्याघ्र भ्रमणमार्ग नसलेल्या क्षेत्रात परवानग्यांचा आग्रह धरून विकासकामांना अडथळा न करता रखडलेल्या प्रकल्पांना तातडीने गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वन विभागाच्या विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. यावेळी वनमंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, अपर मुख्य सचिव (वने) संजय खंदारे यांच्यासह प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), प्रधान



मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र वन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

गडचिरोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रस्ताव प्रत्यक्ष व्याघ्र भ्रमणमार्गात येत नसल्याने या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कामकाज तात्काळ मार्गी लावावे. त्याचबरोबर, २८ किलोमीटरच्या महामार्गापैकी केवळ २ ते ३ किलोमीटरचा भाग व्याघ्र भ्रमणमार्गात येत असल्यास संपूर्ण महामार्गाचे काम थांबविणे योग्य नाही. त्यामुळे उर्वरित भागातील काम तातडीने सुरू करावे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या ३२ अधिकृत व्याघ्र भ्रमणमार्गांचेच निकष 'परिवेश' (PARIVESH) पोर्टलवर लागू करावेत. तसेच जुन्या रस्त्यांचे डांबरीकरण आणि रुंदीकरण करताना अनावश्यक अडथळे निर्माण करू नयेत, असेही निर्देश त्यांनी दिले. मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासोबतच वनालगतच्या शेतकऱ्यांना शाश्वत रोजगार आणि उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र वन विकास महामंडळ आणि एमआयडीसी यांच्या समन्वयातून बांबू लागवड व त्यापासून इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन देण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

संरक्षित क्षेत्रालगत मोठ्या वृक्षांची तोड थांबवून बांबू लागवडीला प्राधान्य द्यावे. उसाच्या तुलनेत बांबूला निम्मे पाणी लागते आणि त्यापासून इथेनॉल निर्मितीची मोठी क्षमता आहे. एमआयडीसीने बांबू लागवडीसाठी जागा भाडेतत्त्वावर घेऊन शेतकऱ्यांना वार्षिक भाडे द्यावे आणि त्या माध्यमातून इथेनॉल निर्मितीचे प्रकल्प उभारावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. राज्यातील १८ लाख हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे साडेपाच लाख हेक्टर क्षेत्र सामूहिक वनहक्कांतर्गत येते. या क्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी स्थापन होणाऱ्या समित्यांचा कार्यकाळ निश्चित करावा. ग्रामसभेने स्थापन केलेल्या सामूहिक वनहक्क समित्यांचा कार्यकाळ संबंधित ग्रामपंचायतीच्या कार्यकाळाशी सुसंगत (Co-terminus) असावा. तसेच तेंदूपत्ता आणि अन्य गौण वनोपजाच्या लिलावासाठी पारदर्शक, शास्त्रीय व निश्चित कार्यपद्धती (SOP) तयार करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

तरुणाने लुटले ३५ लाख

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यात IAS अधिकारी असल्याचे भासवून एका 21 वर्षीय तरुणाने गृहनिर्माण सोसायटीतील नागरिकांची तब्बल 35 लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. हितेश प्रमोद कुलकर्णी असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याने तब्बल 11 महिने सोसायटीतील रहिवाशांचा विश्वास संपादन करून हा आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. बाणेर पोलिसांनी त्याला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. कुलकर्णी हा बालेवाडी हाय स्ट्रीटजवळील एका सोसायटीत राहत होता. त्याने आपण IAS अधिकारी असल्याचे सांगून रहिवाशांचा विश्वास संपादन केला. त्यासाठी त्याने सत्कार समारंभातील छायाचित्रे आणि वृत्तपत्रांतील बातम्यांचाही वापर केला. त्याच्या या दाव्यांवर विश्वास ठेवून सोसायटीतील नागरिकांनी त्याची अध्यक्षपदी नियुक्ती केली. मात्र, पोलिसांच्या तपासानुसार, कुलकर्णीने कधीही IAS परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही. तो केवळ बारावी उत्तीर्ण आहे. 2025 मध्ये तो चिखली येथे राहत असताना त्याने कुटुंबीय आणि शेजाऱ्यांनाही आपण IAS झाल्याचे सांगितले होते. त्याच्या वडिलांनीही त्याची IAS अधिकारी म्हणून ओळख करून दिली होती.

भिडे पूल वाहतुकीसाठी बंद

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यातील मुठा नदीवरील भिडे पूल वाहनांच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहे. डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकाला पेठ परिसराशी जोडणारा नवीन पादचारी पूल उभारण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (महामेट्रो) अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत भिडे पुलावरील वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. मात्र, पुणे वाहतूक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजल्यापासूनच ही वाहतूक बंदी लागू करण्यात आली असून, पुढील आदेश मिळेपर्यंत ती कायम राहणार आहे. डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानक आणि पेठ परिसर यांच्यातील संपर्क अधिक सुलभ करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या भिडे पुलाच्या वर नवीन पादचारी पूल बांधण्यात येणार आहे. या पुलाचा विशेष फायदा नारायण पेठ, शनिवार पेठ आणि लक्ष्मी रस्ता परिसरातील नागरिकांना होणार आहे. या भागातील नागरिकांना सध्या मेट्रो स्थानकापर्यंत पोहोचण्यासाठी रस्त्याचा वापर करावा लागतो. नवीन पादचारी पूल तयार झाल्यानंतर त्यांना मेट्रो स्थानकापर्यंत पोहोचणे अधिक सोयीचे होणार आहे. पुलाच्या बांधकामादरम्यान भिडे पुलावरील वाहनांची वाहतूक बंद राहणार असली, तरी नदीपात्रातून जाणारा रस्ता वाहतुकीसाठी खुला ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतुकीसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

जाहीर नोटीस

तमाम नागरीकांस विशेषतः गाव मौजे करंजाळे, ता. जुन्नर, जि. पुणे येथील सर्व नागरीकांना सदरच्या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे आशिल यांनी खाली परीशिष्ठात नमुद केलेली मिळकत आमचे अशिल श्री. संजय आनंदराव वेताळ यांच्या स्वतंत्र खरेदी मालकीची व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीची मिळकत आहे. सदरील मिळकतीशी अन्य कोणाचाही कोणताही हक्क हितसंबंध केव्हाही नव्हता व नाही. आमचे अशिलांनी सुरुवातीस सदरची मिळकत ही शेती म्हणुन खरेदी केली होती त्यानंतर ती आमचे अशिलांनी शासनाकडुन मोजणीपुर्वक बिनशेती करुन घेतली आहे. परंतु सदरील मिळकती संदर्भात अन्य कोणीतरी इसम आमचे अशिलांची जमीन दर्शवुन विक्री करण्याचे विचारात आहे असे आमचे अशिलांना खात्रीलायकरीत्या समजले आहे. या संदर्भात कोणाचीही फसवणुक होवु नये व आमचे अशिलांचे मिळकती संदर्भात कोणीही कोणताही तबदिलीचा व्यवहार अन्य तिन्हाईत व्यक्तीबरोबर अस्तित्वात आणु नये याकरीता आमचे अशिल सदरची नोटीस मुद्दामहून प्रसिध्द करीत आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन :- तु. पुणे पो.तु.ता. जुन्नर, मे. सब रजि. सो. जुन्नर यांचे हद्दीतील गाव मौजे करंजाळे येथील मिळकत.

ग. नं.	क्षेत्र हे. आर	आकार रु. पै.
११७/३/२/अ/२	०.६०	६००.००

येणेप्रमाणे वर्णनाची बिनशेती जमीन त्यातील तदंगभूत वस्तू व जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह व सर्व इजमेंटरी राईटसह दरोबस्त मिळकत.

सही/-
श्री. पी.आर. लुंकड
अॅडव्होकेट
इंदिरा प्लाझा, शंकरपुरापेठ, जुन्नर, जि. पुणे.

येणेप्रमाणे नोटीस दि. १७/११/२०२६

जाहिर नोटिस

मौजे हडपसर तालुका हवेली, जि. पुणे येथील पुणे महानगरपालिका हद्दीतील हाय कॅपसिटी मास ट्रान्झिट रुट (HCMTR) या सार्वजनिक प्रयोजनासाठी दि.१२/०५/२०१५ रोजीचा शासन निर्णय व तद्अनुषंगीक इतर शासन निर्णयानुसार थेट खरेदी पध्दतीने भूसंपादन.

उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे
यांचे कार्यालय, ७, निलगिरी बंगला, राणीचा बाग,
अल्पबचत भवनमागे, पुणे - ४११००१
दिनांक :-३०/१०/२०२६

क्रमांक : भूसं/खाजगी वाटाघाटी/एसआर/२०/२०२६

ज्याअर्थी उप आयुक्त भूसंपादन व व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी मौजे हडपसर तालुका हवेली, जि. पुणे येथील खालील अनुसूचीत नमूद केलेल्या जमीनी पुणे महानगरपालिका हद्दीतील हाय कॅपसिटी मास ट्रान्झिट रुट (HCMTR) या प्रकल्पासाठी सार्वजनिक प्रयोजनासाठी शासन निर्णय क्र. महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ०३/२०१५/प्र. क्र.३४/अ-२, दि.१२ मे २०१५ व दि.३० सप्टेंबर २०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने उप आयुक्त भूसंपादन व व्यवस्थापन विभाग पुणे महानगरपालिका, पुणे यांचे नावे खरेदी घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडील आदेश क्र. पीएलसी/सीआर/१३३/२०२६, दि.१५/०९/२०२६ अन्वये उक्त प्रस्तावांसंबंधी उक्त शासन निर्णय परिपत्रक दि. १२ मे २०१५ आणि तनुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रकानुसार भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे यांना निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी आता,

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी डॉ. यशवंत माने, उपविभागीय अधिकारी हवेली, उपविभाग पुणे

(अ) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी पध्दतीने उप आयुक्त भूसंपादन व व्यवस्थापन विभाग पुणे महानगरपालिका पुणे यांचे नावे घेणेबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे. आणि

(ब) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हा स्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयुल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमीनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन अंतिम मोबदला निश्चित करण्यात येईल.

(क) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे उप आयुक्त भूसंपादन व व्यवस्थापन विभाग पुणे महानगरपालिका, पुणे यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हा स्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे यांचे कार्यालय, ७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे-४११००१ यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे यांचे कार्यालय, ७. निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे-४११००१ यांचे अधिकाऱ्यांमार्फत भूधारकांस उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे यांचे कार्यालय, ७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे ४११००१ यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहेत.

५. तसेच सदर जमिनीतील मालकी हक्कांबाबत/हिस्सेवारीबाबत कसल्याही प्रकारचा वाद अथवा न्यायालयात दावा सुरु असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांत उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे यांचे कार्यालय, ७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे - ४११००१ यांचे कार्यालयात पुराव्यांसह त्यांचे लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा खरेदी करावयाचे क्षेत्र निर्वेध/निजोखमी आहे असे समजून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल व तद्नंतर प्राप्त होणा-या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

अनुसूची - खरेदी द्यावयाच्या जमीनींचा तपशील

गावाचे नाव : हडपसर तालुका- हवेली जिल्हा- पुणे

अ. क्र.	फायनल प्लॉट नंबर	ग.नं./स.नं.	नगरभूमापन क्रमांक	संपादीत क्षेत्र (चौ.मी)	पुर्व	पश्चिम	दक्षिण	उत्तर
१		१३३	४८००	१२०३.८१	४८००	२८७	४८१६	मुढवा सीमा
२			४८१६	४५९.६७	४८१५	४७८७	कालवा	४८००
३			४८२०	२४.८२	४८२०	कालवा	४८२१	कालवा
४			४८२१	२२.४९	४८२१	कालवा	४८२२	४८२०
५			४८२२	११.८२	४८२२	कालवा	४८२३	४८२१
६			४८२३	१९.५०	४८२३	कालवा	४८२४	४८२२
७		१२९	४८२४	१५.२९	४८२४	कालवा	४८२५	४८२३
८			४८२५	१९.७८	४८२५	कालवा	४८२६	४८२४
९			४८२६	१६.२८	४८२६	कालवा	४८२७	४८२५
१०			४८२७	३५.३२	४८२७	कालवा	४८२८	४८२६
११			४८२८	२०.५२	४८२८	कालवा	४८२९	४८२७
१२			४८२९	२७.५४	४८२९	कालवा	४८३०	४८२८
१३		१२८	४८३०	४२५२	४८३०	कालवा	४८३१	४८२९
१४			४८३१	१२.५२	४८३१	कालवा	४८३२	४८३०
१५		१२७	४८३२	३४.५०	४८३२	कालवा	४८३३	४८३१
१६			४८३३	७३.५९	४८३३	कालवा	४८३५	४८३२
१७		११६	४८३५	६७०.७४	४८३५	एसआर नंबर २६३	४५६३, ४५६४	४८३३
१८		२६३	-	०.४२	४८३५	कालवा	४८३५	४८३३
१९		२५७ ब	४५६४	४७५.८५	४५६३	कालवा	४५६२	४८३५
२०		२५७ अ	४५६३	३७४.७९	४५६१	४५६४	४५६२	४८३५
२१		११५	४५६२	१७५३.०४	४५६१	कालवा	कालवा	४५६३, ४५६४
२२		१५५	४५६१	१९७०.५३	४५६०	४५६४, ४५६२	कालवा	४८३५
२३		२६९	-	५२९३.६४	१७०७	कालवा	एसआर नंबर २५५	कालवा
२४		कालवा	-	२०८६.५८	१७०७	कालवा, २५५	१७०९	२६९
२५		११२	१७०९	२३३७.२९	१७०७	१७०९	१७०६	एसआर नंबर २५५
२६		२५६	१७०७	३५६१.२७	१७०७ कालवा	१७०९ कालवा	१७०६	एसआर नंबर २६९
२७		१५२अ/१	१७०६	७१९२.५७	१७०६ कालवा	१७०६	पुणे सोलापूर रस्ता	१७०९, १७०७
२८		१५२अ/२	-	१६९.६३	एसआर नंबर १५२/अ/२	कालवा	पुणे सोलापूर रस्ता	१७०६
२९			कॅनोल संपादन	७३३९.९४	१५२/ब	रस्ता	पुणे सोलापूर रस्ता	१७०७
३०		१०६	२०४६	१९१६६.९५	२०४६	१९३२	रेल्वे मार्ग	पुणे सोलापूर रस्ता
३१			कॅनोल	४६९४.७८	१७०६	१५२अ/१	पुणे सोलापूर रस्ता	१७०७
३२			रेल्वे मार्ग	१९४०.३३	२०४०	रस्ता	प्लॉट नंबर २	१९३२
३३		३१४ अ	१९३२	१०२.०२	१९३२	३१४अ	रेल्वे मार्ग	एसआर नंबर ३१४अ
३४	फायनल प्लॉट नंबर २			१५६८.४५	२०४६	रस्ता	रस्ता प्लॉट नंबर ४	रेल्वे मार्ग
३५	फायनल प्लॉट नंबर ४			१८६.२१	प्लॉट नंबर २	प्लॉट नंबर ३	प्लॉट नंबर ५	रस्ता
३६	फायनल प्लॉट नंबर ३			४८७७.३०	प्लॉट नंबर २	१९२९	प्लॉट नंबर ४	प्लॉट नंबर १
३७		१०८/अ	१९२९	५५६६.००	प्लॉट नंबर ३	१८०७	प्लॉट नंबर ४३	१९२९
३८		१०९	१८०७	३३८२.२३	१९२९	एसआर नंबर ११०	रस्ता प्लॉट नंबर ७५	१८०७
३९		१०४	२१५२	९७२५.७३	रस्ता प्लॉट नंबर ७५	वानवडी सिमा	प्लॉट नंबर ११३	एसआर नंबर ११०
४०		९८	२१५३	१६६.१८	प्लॉट नंबर ११५	वानवडी सिमा	२१५३	२१५२

टिप :- वरील क्षेत्र भूसंपादन प्रस्तावानुसार नमूद केले असून, संबंधित मोजणी विभागाकडून संयुक्त मोजणीची कार्यवाही होवून, अंतिमतः संपादन क्षेत्र निश्चित झाल्यानंतर त्याप्रमाणे संपादनपात्र क्षेत्राबाबत संपादनाची कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
(डॉ. यशवंत माने)
उपविभागीय अधिकारी हवेली
उपविभाग पुणे

दि. ३०/१०/२०२६
ठिकाण :- पुणे
जिमाका/पुणे/जाहिरात/३४४/२०२६-२७

जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गांव मौजे सितेवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे, येथील व आसपासचे परिसरातील लोकांना आमचे अशिल यांनी दिलेल्या प्रत्यक्ष माहितीवरुन व सांगितलेवरुन तुमहास या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकती संदर्भात १) धिरज जिजाभाऊ औटी, २) सुहास भागाजी गटकळ ३) संतोष कारभारी औटी, ४) राहल रखमाजी रायकर, रा.मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि. पुणे. हे खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत व सदर जमीन त्याचे मालकीहक्क, कबजेवहीवाटीची असुन आमचे आशिल १) आशालता रमेशराव शिंगोटे, रा. बारव ता. जुन्नर, जि. पुणे. २) श्री. निलेश खंडु चतुर रा. मु.पो. सुराळे, ता. जुन्नर, जि. पुणे. यांच्या बरोबर जमीन मालक यांचे बरोबर सदर मिळकतीबाबत तबदिलीचा / खरेदीचा व्यवहार ठरविला आहे.

आमचे अशिलांकडुन जमीन मालक यांनी खालील नमुद केलेली जमीनचे खरेदी व्यवहारापोटी बयाना रक्कम स्वीकारलेली आहे. खालील परिशिष्टात वर्णनातील मिळकत निर्वेध व निजोखमी आहे. सदर मिळकतीवर कोणाचा काहीही एक दान, गहाण, पोटगी, खरेदी, विक्री, साठेखत, करारनामा, बक्षीसपत्र, लिज, लिन, कोर्ट दावा नाही. असे जमीन मालक धिरज जिजाभाऊ औटी, वगैरे. यांनी आमचे आशिलाना सांगीतले आहे. परंतु यापुर्वी कोणीही कसलाही व्यवहार या मिळकती बाबत केला असेलतर तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ८ दिवसांचे आत खालील नमूद पत्यावर कागदपत्रानिशी संपर्क साधाव अन्यथा सदर मिळकतीमध्ये कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत. असे समझुन आमचे आशिल १) आशालता रमेशराव शिंगोटे, रा. बारव ता.जुन्नर, जि. पुणे. २) श्री. निलेश खंडु चतुर. रा. मु.पो. सुराळे, ता.जुन्नर, जि. पुणे. यांचे बरोबर व्यवहार पुर्ण करतील मंग मात्र कोणचाही कोणतीही तक्रार ऐकुण घेतली जाणार नाही. तेव्हा कोणचाही काही हित संबंध असल्यास तो त्यानी जाणीवपुर्वक सोडुन दिला आहे. असे समजण्यात येईल व आमचे अशिल सदरचा मिळकती बाबतचा व्यवहार पुर्ण करतील यांची नोद घ्यावी.

- परिशिष्ठ -

मिळकतीचे वर्णन :- तु. पुणे, पो. तु. ता. जुन्नर, जि. पुणे सब-रजिष्ट्रार सो. जुन्नर यांचे हद्दीतील व पंचायत समीती जुन्नर यांचे हद्दीतील गांव मौजे सितेवाडी, ग्रामपंचायत येथील खाते क्र. ७९३ वरील सामाईक शेतजमीन असुन ती शेतजमीन मिळकत खालीलप्रमाणे,

गट नं.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रु. पै)
३२ पैकी	१.०१	०.६३

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत त्यातील झाड झडोरा लाकूड फाटा, दगड विट, माती, व त्यामधील सर्व प्रकारचे वहिवाटीचे व जाण्यायेण्याच्या रस्त्याचे वहिवाटीच्या हक्कासहित, तसेच कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखुन न ठेवता दरोबस्त. अशी मिळकत. येणे प्रमाणे जाहीर नोटीस

दि. १५/११/२०२६.

अॅडव्होकेट
सही/-
अॅड. मो. शकील अ. इनामदार
राहील कॉम्प्लेक्स, नेहरुबाजार, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे.

१) आशालता रमेशराव शिंगोटे,
२) श्री. निलेश खंडु चतुर यांचे करीता

थोडक्यात पण महत्वाचे



सब-पोस्ट ऑफिससाठी महापालिकेने कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी

पिंपरी : दैनिक संध्या

वाकड, पुनावळे आणि ताथवडे परिसरातील वाढते नागरीकरण आणि नागरिकांची वाढती संख्या लक्षात घेता, भारत सरकारकडून मंजूर झालेल्या पुनावळे आणि ताथवडे सब-पोस्ट ऑफिससाठी महापालिकेच्या माध्यमातून कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नगरसेवक राहुल कलाटे यांनी सप्टेंबर २०२६ मध्ये महापालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे मागणी केली होती. भारत सरकारकडून पुनावळे आणि ताथवडे येथे सब-पोस्ट ऑफिस मंजूर करण्यात आले आहेत. पुनावळे पोस्ट ऑफिससाठी ४११०८६, तर ताथवडे पोस्ट ऑफिससाठी ४११०८७ हा स्वतंत्र पिनकोड निश्चित करण्यात आला आहे. तसेच वाकड परिसरासाठी ४११०८८ हा स्वतंत्र पिनकोड देण्यात आला आहे. या स्वतंत्र पिनकोडच्या अनुषंगाने संबंधित भागांमध्ये स्वतंत्र टपाल कार्यालयांची आवश्यकता अधिक महत्त्वाची ठरत आहे. मात्र, पुनावळे आणि ताथवडे येथील मंजूर सब-पोस्ट ऑफिस सुरू करण्यासाठी जागेचा प्रश्न प्रलंबित आहे. यासाठी महापालिकेने उपलब्ध जागेचा विचार करून संबंधित पोस्ट ऑफिस विभागाला अल्पदरात कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी राहुल कलाटे यांनी आयुक्तांना पाठविलेल्या पत्रातून केली आहे. या परिसरातील नागरिकांना टपाल कार्यालयाशी संबंधित कामांसाठी इतर भागांत जावे लागू नये आणि स्थानिक पातळीवरच टपाल सेवा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने आणि वाकड - ताथवडे - पुनावळे भागातील टपाल सेवा अधिक सुलभ आणि सक्षम करण्यासाठी नगरसेवक राहुल तानाजी कलाटे यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

ॲड. दातीर पाटील यांची बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाच्या 'शिस्तपालन समिती' चेअरमन पदी निवड

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. संजय दातीर पाटील यांना वकिली क्षेत्रात ३३ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असून, त्यांनी आपल्या कारकिर्दीत न्यायव्यवस्था, वकील संघटना आणि सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. सन १९९४ मध्ये महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलकडून वकिलीची सनद प्राप्त केल्यानंतर त्यांनी वकिली व्यवसायास सुरुवात केली. सन १९९६-९७ मध्ये त्यांनी पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनचे उपाध्यक्षपद, तर सन २००६-०७ मध्ये अध्यक्षपद भूषविले. वकिलांच्या हितासाठी त्यांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून, बार असोसिएशनच्या संघटनात्मक कार्यात त्यांचे योगदान मोलाचे राहिले आहे. तसेच बार कौन्सिलच्या निवडणूक समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. सन २००५ पासून नोटरी व्यवसायात कार्यरत असताना त्यांनी बँका व पतसंस्थांना कायदेशीर सल्लागार म्हणून सुमारे ३० वर्षे सेवा दिली आहे. पिंपरी न्यायालय, त्यांनी यशस्वीपणे न्यायालयीन कामकाज केले आहे. याशिवाय,पिंपरी चिंचवड ऍड. सोसायटी चे सचिव आहेत.पुणे लॉयर्स कन्झ्युमर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडचे तज्ज्ञ संचालक सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली आहे. कोविड महामारीच्या कठीण काळात वकील वर्ग आणि गरजू नागरिकांसाठी त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. तसेच पिंपरी-चिंचवड न्यायालयीन इमारतीच्या बांधकाम समितीचे सदस्य म्हणून न्यायालयीन पायाभूत सुविधांच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.



नविन कारचा जल्लोष महामार्गावर! रिल्ससाठी तरुणांची धोकादायक स्टंटबाजी

पिंपरी : दैनिक संध्या

नवीन कार खरेदीचा आनंद साजरा करण्यासाठी तरुणांनी चक्क महामार्गावर धोकादायक स्टंटबाजी केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मुंबई-बंगळुरू महामार्गावरील वाकड परिसरातील कात्रज-देहूरोड बायपासवर हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. रिल्स आणि फोटोशूटसाठी महामार्गावरील वाहतूक रोखल्याचे व्हिडिओत दिसत असून, संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. नवीन कार शोरूममधून घरी नेताना काही तरुणांनी महामार्गावरील अरुंद जागेतून भरधाव वेगात वाहन चालवून चित्रीकरण केले. फोटोशूटसाठी इतर वाहनांची वाहतूकही अडविण्यात आल्याचे दिसते. या प्रकारामुळे महामार्गावरील वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, संबंधित कारवर नियमानुसार नंबर प्लेटऐवजी फॅन्सी नंबरप्लेट लावण्यात आल्याचे दिसते. त्यावर केवळ '१२१२' हे आकडे ठळकपणे दिसत असून, संपूर्ण नोंदणी क्रमांक स्पष्ट होत नाही. व्हिडीओ नेमका कधी चित्रित करण्यात आला आणि संबंधित वाहन कोणाचे आहे, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही.

देहूत इंद्रायणी घाटाची पडझड; भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर!

देहूगाव: दैनिक संध्या

श्रीक्षेत्र देहूगाव येथील मुख्य मंदिर ते पवन धर्मशाळा परिसरादरम्यान इंद्रायणी नदीच्या तीरावर बांधण्यात आलेल्या घाटाचा काही भाग कोसळला असून, अद्याप त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. घाटाचे पडलेले दगड आणि मातीचा ढिगारा तसाच पडून असल्याने परिसराला विद्रूप स्वरूप आले आहे. त्याचबरोबर स्नानासाठी व दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी-भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आळंदी-देहू विकास परिसर समितीच्या वतीने लोकवर्गणीतून २००२ साली इंद्रायणी नदीच्या तीरावर या घाटाची उभारणी करण्यात आली होती. विश्वनाथ कराड यांच्या पुढाकारातून घडीव दगडांचा वापर करून बांधण्यात आलेल्या या घाटामुळे मुख्य मंदिर परिसराच्या सौंदर्यात भर पडली होती. मात्र, १९१४ मध्ये माळीणची घटना घडली, त्या काळात पवन धर्मशाळेसमोरील घाटाचा काही भाग कोसळला होता. तेव्हापासून आजतागायत या पडलेल्या घाटाची पुनर्बांधणी करण्यात आलेली नाही. कार्तिकी यात्रेसह वर्षभरात विविध धार्मिक उत्सवांच्या निमित्ताने हजारो भाविक देहूत येत असतात. त्यामध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांचाही समावेश असतो. इंद्रायणी नदीत स्नानासाठी जाताना घाटावरील पडलेले दगड, निसरड्या पायऱ्या आणि शेवाळ यामुळे भाविकांना मोठा धोका निर्माण झाला आहे.

दुबईतील सायबर गुन्हेगारीसाठी १० ते १२ हजार सिमकार्डचा पुरवठा



ग्राहकांच्या नावाने सिमकार्ड काढून परस्पर विक्री..

सुरज चिकवा आणि राजा कुमार हे मोबाईल सिमकार्ड विक्री कंपनीमध्ये काम करत होते. ग्राहकांच्या नावाने सिमकार्ड काढल्यानंतर संबंधित ग्राहकांना ओटीपी एक्सपायर झाला, सर्व्हर उपलब्ध नसल्याने सिमकार्ड ॲक्टिव्ह झाले नाही, अशी खोटी कारणे सांगून त्यांना सिमकार्ड दिले जात नव्हते. त्याऐवजी ही सिमकार्ड अन्य आरोपींना पुरवून त्याबदल्यात आर्थिक मोबदला घेतला जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तपासादरम्यान मनिष अशोकलाल वाधवा (वय ४४, रा. अंबरनाथ पूर्व) आणि महेश कन्हैयालाल चौइथरामानी (वय ६०, रा. कल्याण पश्चिम) यांचा या सिमकार्ड पुरवठ्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

■ पिंपरी(दै. संध्या)

दुबईतून भारतातील नागरिकांची ऑनलाइन फसवणूक करण्यासाठी तब्बल १० हजार ते १२ हजार मोबाईल सिमकार्ड पुरविणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात आतापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली असून, या सिमकार्डचा वापर करून देशभरात सायबर फसवणुकीचे गुन्हे केल्याचे तपासात समोर आले आहे. या कारवाईमुळे सायबर गुन्हेगारीसाठी बेकायदेशीररीत्या सिमकार्ड पुरविणाऱ्या मोठ्या नेटवर्कचा पर्दाफाश झाला आहे.

पिंपरी-चिंचवड सायबर पोलीस ठाण्यात ऑनलाइन फसवणुकीच्या तक्रारींमध्ये सातत्याने वाढ होत आहे. तपासादरम्यान अनेक आरोपी परदेशात राहून बनावट बँक खाती आणि मोबाईल सिमकार्डच्या माध्यमातून सायबर गुन्हे करत असल्याचे निष्पन्न झाले होते. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी अशा गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

सायबर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या तपासात सुरुवातीला तुषार अमराराम चौधरी (वय २९, रा. सानेवस्ती, चिखली) आणि आदर्श संतोष वाघमारे (वय २७, रा. आकुर्डी) यांना अटक करण्यात आली होती. त्यांच्या चौकशीत सुमंत ऊर्फ नानू रविंद्र दसरे (वय २६, रा. निगडी प्राधिकरण) हा या सायबर फसवणूक प्रकरणातील मुख्य आरोपी असल्याचे समोर आले. तो दुबईत राहून सायबर गुन्हे करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

सुमंत दसरे याच्याविरोधात लुकआऊट सर्क्युलर (LOC) जारी करण्यात आले होते. इंटरपोलच्या माध्यमातून त्याला भारतात आणण्यात आल्यानंतर सायबर पोलिसांच्या पथकाने मुंबई विमानतळावरून ताब्यात घेऊन अटक केली. त्याच्या चौकशीत तो चीनमधील एका नागरिकासोबत मिळून सायबर फसवणुकीचे गुन्हे करत असल्याचे उघड झाले. या गुन्ह्यांसाठी लागणारे १० ते १२ हजार मोबाईल सिमकार्ड त्याने भारतातून मिळविल्याचेही तपासात समोर आले.पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे त्यांना मुंबई परिसरातून ताब्यात घेऊन अटक केली. या दोघांनी सुमंत दसरे याला दुबईत पुरविलेली सिमकार्ड सुरज मुन्नालाल चिकवा (वय ३२, रा. विक्रोळी, मुंबई, मूळ रा. चित्रकूट, उत्तर प्रदेश) आणि राजा अशोक कुमार (वय ३१, रा. ठाणे पश्चिम, मूळ रा. वैशाली, बिहार) यांच्याकडून मिळविल्याचे तपासात उघड झाले. त्यानुसार पोलिसांनी सुरज आणि राजा यांनाही अटक केली. कॉलिंग, बनावट ॲप्लिकेशनची नोंदणी, बँक खात्यांशी लिंक करून आर्थिक व्यवहार, तसेच बनावट ई-मेल आयडी तयार करण्यासाठी केला जात होता. स्वतःची ओळख लपवून सायबर गुन्हे करण्यासाठी या सिमकार्डचा वापर होत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे, मनिष वाधवा आणि महेश चौइथरामानी यांच्या पासपोर्टची तपासणी केली असता ते २५ ते ३० वेळा दुबईला गेल्याचे आढळून आले आहे. या संपूर्ण नेटवर्कमध्ये आणखी किती जणांचा सहभाग आहे आणि पुरविण्यात आलेल्या सिमकार्डचा इतर किती सायबर गुन्ह्यांमध्ये वापर झाला आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

सात आरोपींची नावे आणि भूमिका १. तुषार अमराराम चौधरी – बँक खातेधारक २. आदर्श संतोष वाघमारे – बँक खाते हाताळणारा ३. सुमंत ऊर्फ नानू रविंद्र दसरे – मुख्य आरोपी, दुबईतून सायबर गुन्हे ४. मनिष अशोकलाल वाधवा – दुबईत सिमकार्ड पुरवठा ५. महेश कन्हैयालाल चौइथरामानी – दुबईत सिमकार्ड पुरवठा ६. सुरज मुन्नालाल चिकवा – सिमकार्ड मिळवून देणारा ७. राजा अशोक कुमार – सिमकार्ड मिळवून देणारा.

पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सहपोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, पोलीस उपायुक्त (गुन्हे) रोहिदास पवार आणि सहायक पोलीस आयुक्त (सायबर व आर्थिक गुन्हे) रोहिणी बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे, पोलीस निरीक्षक दिगंबर गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण स्वामी, वैभव पाटील, पोलीस उपनिरीक्षक रोहित डोळस, सागर पोमण यांच्यासह पोलीस पथकाने या कारवाईत सहभाग घेतला.

कल्पकतेतून परिसराचे सुशोभीकरण

■ पिंपरी (दै. संध्या)



वारंवार कचरा साठणारी ठिकाणे (गार्बेज व्हल्नरेबल पॉइंट – GVP) स्वच्छ, सुंदर आणि आकर्षक बनविण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून महापौर रवि लांडगे, उप महापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात विविध अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहेत.

याच उपक्रमांतर्गत 'ल' क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक २० मधील डी. वाय. पाटील लॉ कॉलेज, फुलेनगर येथील वारंवार कचरा साठणाऱ्या ठिकाणाचे टाकाऊ वस्तूंच्या कल्पक आणि कलात्मक पुनर्वापरातून आकर्षक स्थळात रूपांतर करण्यात आले आहे.

कल्पकतेचा स्पर्श आणि सौंदर्यदृष्टीची जोड देत निरुपयोगी वस्तूंना नवे रूप बहाल करण्यात आले असून, कचऱ्याच्या जागी सौंदर्याची नवी निर्मिती साकारली आहे. या अभिनव उपक्रमातून परिसराचे रूपडे पालटण्यासोबतच पुनर्वापराचे महत्त्व आणि स्वच्छतेचा संदेशही त्यानिमित्ताने देण्यात येत आहे. या परिसरात यापूर्वी कचरा टाकला जात असलेल्या ठिकाणी विविध टाकाऊ वस्तूंचा सुबक आणि कलात्मक पद्धतीने वापर करण्यात आला.

'अ' क्षेत्रीय कार्यालयात स्थायी समिती सभापती बारणे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)



शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आज 'अ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एक महत्त्वाची संयुक्त बैठक पार पडली. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकित उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा सभापती प्रमोद कुटे, नगरसेवक उत्तम केंदळे, राजू मिसाळ, बापू घोलप, अमित गावडे, सुजाता कारंडे, तसेच महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी, दळणवळण विभाग, बीआरटीएस विभाग, वाहतूक विभाग आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरात पार्किंग पॉलिसीच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील वाहतूक व्यवस्था, पार्किंगच्या निर्माण झालेल्या समस्या, रस्त्यांवरील अडचणी तसेच नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या विविध नागरी समस्यांचा सखोल आढावा घेण्यात आला. या वाहतुकीच्या मुद्द्यांसोबतच पाणीपुरवठा, वीज, आरोग्य, स्वच्छता आणि इतर सर्व महत्त्वाच्या विभागांच्या कामकाजासंदर्भातही संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

नागरिकांकडून सातत्याने मांडण्यात येणाऱ्या समस्या, प्रलंबित कामे आणि आवश्यक उपाययोजनांबाबत प्रत्येक विभागाला योग्य त्या कठोर सूचना देण्यात आल्या असून, कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

स्वीकृत नगरसेवक निवडीचा तिढा सुटणार; २० नोव्हेंबरच्या सर्वसाधारण सभेत शिक्कामोर्तब होणार?

■ पिंपरी(दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महापालिकेतील स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीचा गेल्या दहा महिन्यांपासून रखडलेला विषय अखेर मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. येत्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या तहकूब सर्वसाधारण सभेत सत्ताधारी भाजपकडून स्वीकृत नगरसेवकपदासाठी ७ नावे सादर केली जाणार असल्याचे जवळपास निश्चित झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळात आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन आणि भाजपचे सात असे एकूण दहा स्वीकृत नगरसेवक महापालिकेत नियुक्त होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

महापालिका निवडणुकीत भाजपने ८४ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले, तर राष्ट्रवादी काँग्रेसला ३६ जागा मिळाल्या. या संख्याबळानुसार राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या वाट्याला आलेल्या तीन स्वीकृत नगरसेवकपदांसाठी सीमा सावळे, राजेंद्र जगताप आणि फजल शेख यांची नावे दिली आहेत. मात्र, भाजपकडून गेल्या अनेक महिन्यांपासून स्वीकृत नगरसेवकांची नावे निश्चित केली जात नव्हती. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसने दिलेल्या नावांमध्ये बदल व्हावा, यासाठीही प्रयत्न सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. त्यामुळे स्वीकृत नगरसेवक नियुक्तीचा विषय सातत्याने पुढे ढकलला जात होता. विविध कारणे देत सत्ताधारी भाजपकडून हा विषय लांबणीवर टाकण्यात येत असल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये नाराजी होती. राष्ट्रवादी काँग्रेसकडूनही याबाबत नाराजी व्यक्त केली जात होती. अखेर आता भाजपने स्वीकृत नगरसेवक नियुक्तीचा निर्णय घेतल्याचे समजते. २० नोव्हेंबरच्या तहकूब सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर नियुक्तीचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. राष्ट्रवादीची तीन नावे आधीच निश्चित असल्याने भाजपकडून सात नावे सभेत सादर करून त्यावर अंतिम शिक्कामोर्तब केले जाण्याची शक्यता आहे.त्यामुळे गेल्या दहा महिन्यांपासून सुरू असलेल्या स्वीकृत नगरसेवक निवडीच्या राजकीय घडामोडींना अखेर पूर्णविराम मिळणार का, याकडे इच्छुकांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये प्रेमभंगाचा मानसिक आरोग्यावर परिणाम

■ पिंपरी (दै. संध्या)

आयुष्यभर एकत्र राहण्याची स्वप्ने पाहिली जातात. मात्र, याच नात्यात दुरावा निर्माण झाल्यानंतर काहींच्या जगण्याची उमेद हरवत असल्याचे चिंताजनक वास्तव समोर आले आहे. प्रेमातील अपयश, जोडीदाराने दिलेला नकार आणि नातेसंबंधातील तणावाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत सात ते आठ जण आत्महत्या करीत असल्याचे पोलिसांच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. प्रेमसंबंधातील भावनिक संघर्षातून टोकाचे पाऊल उचलण्याच्या या घटना मानसिक आरोग्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण करीत आहेत.

सुरकुंडीत गरजू कुटुंबांना नगरसेवक सचिन तापकीर यांचा मदतीचा हात.!

आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम; धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप

■ पिंपरी (दै. संध्या)




चऱ्होली येथील भाजपचे नगरसेवक सचिन तापकीर यांनी सहकाऱ्यांसह खेड तालुक्यातील सुरकुंडी गावाला भेट देऊन गरजू कुटुंबांना धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप केले. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमांतर्गत तापकीर यांनी पुढाकार घेऊन ही मदत गावातील कुटुंबांपर्यंत पोहोचवली.

यावेळी सुरकुंडीचे सरपंच शशिकांत वाजे, उपसरपंच सुनील सुपे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ सरोदे, सामाजिक कार्यकर्ते बाळू घिगे, संकेत वाजे आणि भीमा जाधव, तसेच मारुती भोकटे, सोमनाथ सावंत, योगेश केदारी, विठ्ठल वाजे आणि वाजेवस्तीतील ग्रामस्थ उपस्थित होते. भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि प्रदेश महामंत्री राजेश पांडे यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ झाला. 'एक नगरसेवक, एक गाव' या संकल्पनेतून खेड, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांतील ५१ आदिवासी गावांमधील गरजू कुटुंबांना महिनाभर पुरेल असे किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंचे किट देण्याचे नियोजन आहे. नगरसेवक सचिन तापकीर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी खेड तालुक्यातील मौजे माजगाव येथेही भेट दिली. तेथील गरजू कुटुंबांना धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप केले. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून गरजू कुटुंबांना आधार देण्याचा संकल्प या मदतकार्यातून माजगावातही कृतीत उतरला. "आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून गरजू कुटुंबांना आधार देण्याचा आम्ही संकल्प केला. त्यातूनच सहकाऱ्यांसह सुरकुंडी आणि माजगाव येथे जाऊन धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंचे किट दिले. या मदतीमुळे कुटुंबांना दैनंदिन खर्चात काहीसा दिलासा मिळेल, अशी आशा आहे, असे सचिन तापकीर, नगरसेवक, भाजपा, चऱ्होली यांनी सांगितले.

थोडक्यात पण महत्वाचे

शेतकऱ्याच्या संकटसमयी धावून आले शरयूचे अग्निशमन दल; नुकसान टळले!



आळजापूर (फलटण) : दैनिक संध्या

आळजापूर,ता.फलटण येथील शेतकरी श्री.अजित नलवडे यांच्या ऊस पिकाला अचानक आग लागल्याची घटना घडली.दुष्काळी परिस्थितीत मोठ्या कष्टाने जोपासलेले आणि हातातोंडाशी आलेले ऊस पीक आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्याची भीती निर्माण झाली होती. ही माहिती मिळताच शरयू साखर कारखान्याच्या कापशी येथील अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली.अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे संभाव्य नुकसान टळले आणि मोठा अनर्थ रोखण्यात यश आले. शेतकऱ्याच्या अडचणीच्या काळात मदतीला धावून जाणे,हीच खरी सामाजिक बांधिलकी! या तत्पर मदतीबद्दल संबंधित शेतकरी श्री. अजित नलवडे तसेच आळजापूर परिसरातील ग्रामस्थांनी शरयू साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक मा.श्री.युगेंद्रदादा पवार व कारखाना व्यवस्थापनाचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सदैव सहभागी होणाऱ्या शरयू परिवाराचे हे कार्य निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे.

भरधाव चारचाकी थेट मारुती मंदिरात घुसली; मंदिराचे नुकसान



वालचंदनगर : दैनिक संध्या

बारामती-अकलूज रस्त्यावर इंदापूर तालुक्यातील कळंब गावाजवळ नातेपुतेकडे जाणाऱ्या चौकानजीक मंगळवार (दि. १७ नोव्हेंबर) रोजी रात्री सुमारे दहाच्या सुमारास भरधाव वेगाने जाणारी चारचाकी गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या मारुती मंदिरात घुसली. या अपघातात मंदिराचे नुकसान झाले असून, सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, चारचाकी वाहन भरधाव वेगाने जात असताना रस्त्यावरील नागरिकांना वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे गाडी थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या मारुती मंदिरात जाऊन धडकली. या धडकेत मंदिराचे नुकसान झाले. मात्र, या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नाही. कळंब गावाजवळील नातेपुतेकडे जाणाऱ्या चौकात वाहनांची मोठी वर्दळ असते. या ठिकाणी वाहनांचा वेग अधिक असल्याने अपघाताचा धोका कायम आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित प्रशासनाने या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसवावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

सुपा पोलिसांची तत्परता अन् नागरिकांचे सहकार्य

८० फूट खोल विहिरीतून मृतदेह बाहेर काढण्यात यश!



■ भोंडवेवाडी (सुपा) (दै. संध्या)

सुपा पोलीस स्टेशन हद्दीतील भोंडवेवाडी गावच्या शिवारात लालासो देवकाते यांच्या शेतातील विहिरीमध्ये एका ४५ वर्षीय इसमाचा मृतदेह आढळून आल्याची घटना दिनांक १७/११/२०२६ रोजी समोर आली.

नामदेव लकडे (वय ४५ वर्षे,रा.सुपा,ता. बारामती,जि.पुणे) असे मयत इसमाचे नाव आहे. सदर घटनेची माहिती सुपा पोलीस स्टेशन येथे प्राप्त होताच पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पाहणी केली असता सुमारे ७० ते ८० फूट खोल विहिरीमध्ये पुरुष जातीचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला.रात्रीची वेळ व अंधार असल्याने तसेच विहिरीची खोली अधिक असल्याने मृतदेह बाहेर काढणे अत्यंत आव्हानात्मक होते.

अशा प्रतिकूल परिस्थितीत सुपा पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांनी परिसरातील नागरिक व पोलीस पाटील यांच्या सहकार्याने क्रेनची व्यवस्था केली. क्रेनच्या सहाय्याने विहिरीमध्ये बाज सोडून पोलीस अधिकारी, अंमलदार व स्थानिक नागरिक यांच्या समन्वयातून अथक प्रयत्नांनंतर मृतदेह सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढण्यात यश आले.

त्यानंतर मृतदेह पुढील वैद्यकीय तपासणीसाठी मेडिकल कॉलेज, बारामती येथे पाठविण्यात आला. तेथील डॉक्टरांनी तपासणी करून नामदेव लकडे यांना मृत घोषित केले. याप्रकरणी खबर देणार गुलाब सोमा महानवर (वय ४१ वर्षे,रा. महानवरवस्ती,सुपा,ता.बारामती,जि. पुणे) यांनी दिलेल्या खबरीवरून सुपा पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यू क्रमांक ३५/२०२६, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ अन्वये नोंद करण्यात आली आहे.सदर घटनेचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक ताकवणे हे करीत आहेत. सदर मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्याच्या आव्हानात्मक कार्यात सुपा पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अंमलदार, भोंडवेवाडी व कुतवळवाडी गावांतील परिसरातील नागरिक तसेच पोलीस पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.त्यांच्या सहकार्यामुळे हे कार्य यशस्वीरीत्या पूर्ण करता आले.याबद्दल सुपा पोलीस स्टेशनच्या वतीने सर्व पोलीस अधिकारी,अंमलदार, पोलीस पाटील व सहकार्य करणाऱ्या नागरिकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

यंदाची बारामती पॉवर मॅरेथॉन स्व. अजितदादा पवारांना समर्पित

बारामतीत 'नॅशनल एग्ज को-ऑर्डिनेशन कमिटी आणि व्हेंकोब चिकन प्रस्तुत बारामती पॉवर मॅरेथॉन २०२६'चा तीन दिवसीय क्रीडा महोत्सव



■ बारामती (दै. संध्या)

क्रीडा क्षेत्रात बारामतीची आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख अधिक भक्कम करणाऱ्या 'इंडियाज् आयकॉनिक बारामती पॉवर मॅरेथॉन २०२६' च्या चौथ्या पर्वाचे आयोजन यंदा तीन दिवसीय भव्य क्रीडा महोत्सवाच्या स्वरूपात करण्यात येणार आहे. रविवार,दि.२९ नोव्हेंबर रोजी मुख्य मॅरेथॉन स्पर्धा रंगणार असून, त्याआधी २७ आणि २८ नोव्हेंबर रोजी स्पोर्ट्स एक्स्पो,बिब डिस्ट्रीब्यूशन,मनोरंजनाचे कार्यक्रम आणि स्थानिक खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सची मेजवानी बारामतीकरांना अनुभवता येणार आहे.या संपूर्ण आयोजनाची माहिती बारामती स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

लोकनेते स्व.अजितदादा पवार साहेब यांच्या मार्गदर्शनातून आणि भक्कम पाठिंब्यातून सुरू झालेली ही मॅरेथॉन यंदा त्यांना समर्पित करण्यात आली आहे. अजितदादांच्या कार्याचा गौरव ही यंदाच्या मॅरेथॉनची मध्यवर्ती संकल्पना असणार आहे.त्यांच्या स्मृतींना अभिवादन करत क्रीडा,आरोग्य,फिटनेस आणि सामाजिक सहभागाचा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे. मॅरेथॉन महोत्सवाचा प्रारंभ शुक्रवार,दि. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या हस्ते स्पोर्ट्स एक्स्पो आणि बिब डिस्ट्रीब्यूशनच्या उद्घाटनाने होणार आहे.या एक्स्पोमध्ये तब्बल ३० स्टॉल्स उभारण्यात येणार असून, विविध आंतरराष्ट्रीय क्रीडा ब्रँड्सची उत्पादने बारामतीकरांसह सहभागी धावपटूंना पाहण्याची, अनुभवण्याची आणि खरेदी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. क्रीडाप्रेमींसाठी हा एक्स्पो विशेष आकर्षण ठरणार आहे.

शुक्रवार आणि शनिवार, दि. २७ व २८ नोव्हेंबर या दोन्ही दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत स्पोर्ट्स एक्स्पो आणि बिब डिस्ट्रीब्यूशन सुरू राहणार आहे. या काळात मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या धावपटूंना आपले बिब आणि स्पर्धेचे किट वितरित करण्यात येणार आहे.

मॅरेथॉन हा केवळ धावण्याचा कार्यक्रम न राहता संपूर्ण कुटुंबासाठी आनंददायी अनुभव ठरावा,या उद्देशाने दोन्ही दिवस विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विविध गेम्स,मॅजिक शो, फूड स्टॉल्स आणि मनोरंजनाचे विशेष कार्यक्रम असणार आहेत. त्यामुळे सर्वांना क्रीडा,खरेदी, खाद्यसंस्कृती आणि मनोरंजनाचा एकत्रित अनुभव घेता येणार आहे. रविवार,दि. २९ नोव्हेंबर हा मॅरेथॉनचा मुख्य दिवस असणार आहे.उपमुख्यमंत्री मा.ना सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत रेल्वे स्टेशन ग्राउंड,बारामती येथून स्पर्धेला सुरुवात होणार असून, चार विविध अंतरांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

४२ किमी फुल मॅरेथॉन : फ्लॅग ऑफ पहाटे ४:०० वाजता
२१ किमी हाफ मॅरेथॉन : फ्लॅग ऑफ सकाळी ६.०० वाजता
१० किमी रन : फ्लॅग ऑफ सकाळी ६:३० वाजता
५ किमी फन रन : फ्लॅग ऑफ सकाळी ७:५५ वाजता

अनुभवी धावपटूंपासून नवोदित धावपटू,युवक-युवती,कुटुंबीय आणि फिटनेसप्रेमी नागरिकांपर्यंत सर्वांना या स्पर्धेत सहभागी होता यावे,यासाठी चार प्रकारांची रचना करण्यात आली आहे.

यंदाच्या मॅरेथॉनमध्ये एकूण १० लाख रुपयांची पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. ४२ किमी, २१ किमी, १० किमी आणि ५ किमी अशा चारही प्रकारांमध्ये विविध वयोगटांनुसार पारितोषिकांची व्यवस्था करण्यात येणार आहे.प्रत्येक गटातील प्रथम ३ धावपटूंचा गौरव केला जाणार आहे.

कमी पाण्यावर येणाऱ्या हरभरा पिकाचा शेतकऱ्यांनी आधार घ्यावा

सभापती किरण तावरे



■ बारामती (दै. संध्या)

रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार व प्रमाणित बियाणे उपलब्ध व्हावे,या उद्देशाने मा.उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी पवार यांचे माध्यमातुन सन 2026-27 चे जिल्हा परिषद सेस फंडातुन या बियाण्यांसाठी तरतुद करुन त्याअंतर्गत बारामती पंचायत समिती कृषी विभागाच्या वतीने एकुण पात्र 75 शेतकऱ्यांना फुले विश्वराज या हरभरा बीयाण्याचे वाटप करण्यात आले.बारामती पंचायत समितीचे सभापती किरण तावरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि शुभहस्ते हा बियाणे वाटप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उपसभापती शुभांगीताई आगवणे, जिल्हा परिषद सदस्या रोहिणीताई कदम (ढोले),पंचायत समितीचे गटनेते बाबा चोरमले,उपगटनेते नितीन काकडे,सदस्य जितेंद्र पवार,दिग्वीजय जगताप,अनिकेत गावडे, राजश्रीताई टकले, शामलताई वाबळे, वैशालीताई कोकणे, आशाबाई वायाळ, उज्वलाताई खैरे,गटविकास अधिकारी किशोर माने,कृषी अधिकारी देविदास सारंगकर, सुनील गायकवाड उपस्थित होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सभापती किरण तावरे यांनी रब्बी हंगामात आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा आणि सुधारित वाणांच्या बियाण्यांचा वापर करून अधिक उत्पादन घेण्याचे आवाहन केले.पंचायत समितीच्या माध्यमातून शासनाच्या विविध कृषी योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.या कार्यक्रमास तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमामुळे रब्बी पेरणीसाठी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, लाभार्थी शेतकऱ्यांनी पंचायत समिती प्रशासना विषयक कृतज्ञता व्यक्त केली. गटविकास अधिकारी किशोर माने यांनी उपस्थित शेतकऱ्यांचे आभार मानले.

तळेगाव दाभाडे नगर परिषद

तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे
दूरध्वनी क्र : १८००-२३३-२७३४
ई-मेल : talegaondabhademc@gmail.com
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. ४२५९/२०२६ दिनांक : १६/११/२०२६

जाहीर निविदा सूचना

तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समिती अंतर्गत नगरपरिषद हद्दीतील महिलांना खालील तपशीलातील प्रशिक्षण द्यावयाचे आहे. त्याकरिता नोंदणीकृत संस्था, शासकीय व निमशासकीय निविदाधारकांनी निविदा भरावयाची आहे. सर्व करारासहीत द्विलिफाफा पद्धतीने निविदा मागविणेत येत आहे.

अ. क्र.	कामाचा तपशील	बयाणा रक्कम रूपये	कोरी निविदा फॉर्मची किंमत रुपये
१	२	३	५
१	मेहंदीचे प्रशिक्षण	५०००/-	५०० /-+GST
२	AI FOR All चे प्रशिक्षण	५०००/-	५०० /-+GST

निविदा वेळापत्रक

अ. क्र.	नगरपरिषद प्रक्रिया	कालावधी
१	कोरे निविदा अर्ज घेणे	दि. १९/११/२०२६ ते २५/११/२०२६ कार्यालयीन वेळेत
२	बयाना रक्कमेसह निविदा अर्ज स्विकारणे	दि. २६/११/२०२६ दुपारी ०१.०० पर्यंत
३	निविदा उघडणे	दि. २६/११/२०२६ सायं. ०४.०० पर्यंत

कोणत्याही कारणामुळे त्याच दिवशी निविदा उघडणे शक्य न झाल्यास त्याबाबतची निविदा उघडणेची पुढील तारीख व वेळ नगरपरिषद सुचना फलकावर लावण्यात येईल. याबाबत कोणतीही व कोणासही स्वतंत्र सुचना देण्यात येणार नाही. निविदाबाबत अटी, शर्ती इ. ची अधिक माहिती कार्यालयीन वेळेत कार्यालयातील महिला व बालकल्याण विभाग तळेगाव दाभाडे नगरपरिषद येथे मिळेल. सादर करण्यात आलेल्या निविदापैकी एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क नगरपरिषदेने राखुन ठेवला आहे.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
तळेगाव दाभाडे नगरपरिषद

जा.क्र. ४२५९/ ०२६ दि. १६/११/२०२६

पुणे जिल्हा परिषद, बांधकाम विभाग (दक्षिण)

ई - निविदांतर्गत खुली बी १ निविदा सुचना क्रं. ३१ सन २०२६-२७

पुणे जिल्हा परिषद, नवीन प्रशासकीय इमारत, वेलस्ली रोड, कॅम्प पुणे-१ यांच्या वतीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे तर्फे बारामती-६, हवेली-६, इंदापुर-४ एकूण-१६ कामांची ई-निविदा http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १२/११/२०२६ रोजी स. १०.०० वा. प्रसिध्द करणेत आल्या आहेत. ई निविदेबाबत संपूर्ण माहिती http:mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (दक्षिण)
जिल्हा परिषद, पुणे

सही/-
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पुणे

महावितरण — ई-निविदा सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महावितरण बारामती विभागाअंतर्गत आउटडोअर केबल एंड किटची दुरुस्ती व देखभाल संबंधित कामे करणेसाठी **ई-निविदा क्रमांक EE/BMT/T-18/26-27 (निविदा रक्कम रूपये १० लाख)** ठेका पध्दतीने नामांकित व नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार यांचेकडुन ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदा विक्री कालावधी १८.११.२०२६ ते २५.११.२०२६, १५.०० पर्यत, निविदा भरण्याची अंतिम तारीख २५.११.२०२६, १५.३० पर्यंत, तांत्रिक निविदा उघडणेची तारीख २६.११.२०२६, ११.०० असुन, काही अपरिहार्य कारणास्तव नियोजित तारखेस निविदा न उघडल्यास दुसऱ्या दिवशी उघडण्यात येतील. इसारा शुल्क ऑनलाईन/बिजीच्या स्वरुपात निविदा भरणा मुदतीपूर्वी विभागीय कार्यालयात भरणे आवश्यक आहे. अधिक माहिती कृपया कंपनीचे संकेतस्थळ https://etender. mahadiscom. in/eatApp/

कार्यालयाचा पत्ता: ऊर्जा भवन, भिगवण रोड, बारामती. फोन नं - ०२११२-२४३१७२

PRO No:- PRO/BMTZ/149/2026-27

कार्यकारी अभियंता, बारामती विभाग

श्वास गुदमरण्यापूर्वीच अतिक्रमणांचा विळखा सोडवा!

रस्ते, सभागृहे, जकात नाके, मैदाने ते स्मशानभूमींपर्यंत अतिक्रमणांचे जाळे; विशेष मोहीम राबविण्याची नागरिकांची मागणी

■ भिवंडी (दै. संध्या)



भिवंडी शहरातील रस्ते, पदपथ, मोकळ्या जागा आणि महानगरपालिकेच्या सार्वजनिक मालमत्तांवर वाढत चाललेल्या अतिक्रमणांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. शहरातील अनेक सार्वजनिक जागा, महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारती आणि विविध सुविधा खासगी व्यक्तींच्या ताब्यात किंवा अनधिकृत वापरात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर भिवंडी महानगरपालिका आयुक्तांनी केलेली पाहणी आणि अनधिकृत वापराविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे दिलेले निर्देश स्वागतार्ह असले, तरी ही कारवाई केवळ काही ठरावीक ठिकाणांपुरती मर्यादित न राहता संपूर्ण शहरात व्यापक स्वरूपात राबविण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी सुमारे १.३० ते २ वाजण्याच्या दरम्यान महानगरपालिका आयुक्तांनी सह्याद्रीनगर-शांतीनगर परिसरातील प्रभाग क्रमांक १४ मधील प्राथमिक आरोग्य केंद्र, भादवड येथील सोनादेवी सभागृह आणि सह्याद्रीनगर आरोग्य केंद्राशेजारील देविदास गुळवी सभागृहाची पाहणी केली. या पाहणीदरम्यान महानगरपालिकेच्या सभागृहाची चावी अनिलकुमार सुभाषचंद्र गुप्ता (वय ३५) या खासगी व्यक्तीकडे आढळून आल्याची माहिती समोर आली. महानगरपालिकेच्या मालमत्तेचा दीर्घकाळ अनधिकृत वापर होत असल्याने महापालिकेच्या महसुलाचेही नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार आयुक्तांनी संबंधित व्यक्तीविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. पुढील कार्यवाहीसाठी संबंधित व्यक्तीला शांतीनगर पोलीस चौकीत नेण्यात आले. महानगरपालिकेच्या मालमत्तांचा खासगी किंवा अनधिकृत वापर कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. महानगरपालिकेच्या मालमत्ता या सर्वसामान्य नागरिकांच्या उपयोगासाठी आहेत. त्यांचा वापर नागरिकांच्या हितासाठीच झाला पाहिजे, अशी भूमिका आयुक्तांनी मांडत महानगरपालिकेच्या मालमत्तांचा आढावा घेऊन त्या ताब्यात घेण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

मात्र, भिवंडीतील अतिक्रमणांचा प्रश्न केवळ सभागृहांपुरता मर्यादित नाही. शहरातील अनेक मुख्य रस्त्यांवर वर्षानुवर्षे वाहने उभी केली जातात. वापरात नसलेली तसेच भंगार झालेली वाहने, हातगाड्या, मोटार गॅरेज, दुचाकी दुरुस्तीची दुकाने, व्यावसायिक केबिन आणि अन्य व्यावसायिक आस्थापनांनी रस्त्यांचा व सार्वजनिक जागांचा मोठा भाग व्यापल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येते. त्यामुळे रस्त्यांची रुंदी कमी होऊन वाहतुकीला अडथळे निर्माण होतात. पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागा मिळत नाही आणि नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत एखादी रुग्णवाहिका किंवा अग्निशमन दलाचे वाहन अडकल्यास गंभीर प्रसंग उद्भवू शकतो. महानगरपालिकेची सांस्कृतिक केंद्रे, सार्वजनिक सभागृहे, व्यायामशाळा, रात्रनिवारा केंद्रे, मैदाने, शासकीय जमिनी आणि इतर सार्वजनिक मालमत्तांचीही सखोल तपासणी होणे आवश्यक आहे. या मालमत्तांवर खासगी व्यक्तींचा किंवा राजकीय प्रतिनिधींशी संबंधित व्यक्तींचा अनधिकृत ताबा आहे का, त्यांचा वापर मूळ उद्देशाप्रमाणे होतो का, याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. सार्वजनिक मालमत्तेचा वापर कोणत्याही व्यक्तीच्या वैयक्तिक फायद्यासाठी होऊ नये, ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

भिवंडीतील साईबाबा जकात नाक्याच्या जागेबाबत यापूर्वी काही पत्रकारांनी खासगी व्यक्तीने अतिक्रमण करून तेथे केबिन उभारल्याचे तसेच जकात नाक्याच्या जागेतच निवासाची व्यवस्था केल्याचे वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्तातील बाबींची महानगरपालिका प्रशासनाने अधिकृत तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करणे आवश्यक आहे. शहरातील इतर बंद किंवा वापरात नसलेल्या जकात नाक्यांच्या जागांचाही आढावा घेऊन त्या महानगरपालिकेच्या ताब्यात सुरक्षित आहेत की नाहीत, याची खातरजमा करावी.

आयुक्तांनी केलेली पाहणी ही निश्चितच सकारात्मक सुरुवात आहे. मात्र, भिवंडीतील अतिक्रमणांचा प्रश्न सोडविण्यासाठी केवळ काही मालमत्तांची पाहणी करून चालणार नाही. शहरातील सर्व महानगरपालिका व शासकीय मालमत्तांचे सर्वेक्षण करून त्यांची मालकी, प्रत्यक्ष ताबा, वापराचा उद्देश आणि जबाबदार व्यक्ती यांची नोंद तयार केली पाहिजे. अनधिकृत ताबे आढळल्यास नियमानुसार कारवाई करून संबंधित मालमत्ता महानगरपालिकेच्या ताब्यात घ्याव्यात. त्यासाठी पोलीस, महसूल विभाग आणि संबंधित शासकीय यंत्रणांची मदत घेणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर रस्त्यांवरील अनधिकृत पार्किंग, भंगार वाहने, हातगाड्या, गॅरेज, दुचाकी दुरुस्तीची दुकाने, व्यावसायिक केबिन, सार्वजनिक सभागृहे, सांस्कृतिक केंद्रे, व्यायामशाळा, रात्रनिवारा केंद्रे, मैदाने, जकात नाके आणि स्मशानभूमी या सर्व ठिकाणांचा एकत्रित आढावा घेतला पाहिजे. ही मोहीम कोणत्याही राजकीय दबावाला, सामाजिक प्रभावाला किंवा आर्थिक हितसंबंधांना बळी न पडता निष्पक्षपणे राबविली गेली पाहिजे. कारवाई केवळ काही व्यक्तींवर न होता नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सर्वांवर समान निकषांनी झाली पाहिजे.

स्मशानभूमींच्या व्यवस्थापनावरही प्रश्नचिन्ह!

शहरातील काही स्मशानभूमींमधील अतिक्रमण आणि व्यवस्थापनाबाबतही नागरिकांकडून गंभीर तक्रारी केल्या जात आहेत. काही ठिकाणी स्मशानभूमींच्या प्रवेशद्वाराच्या चाव्या आणि व्यवस्थापनावर खासगी व्यक्तींचे नियंत्रण असल्याच्या तक्रारी आहेत. काही नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित कर्मचारी किंवा कामगारांकडे चाव्या असूनही स्मशानभूमीचे प्रवेशद्वार उघडण्यासाठी स्थानिक प्रभावशाली व्यक्तींना फोन करावा लागतो किंवा त्यांची परवानगी घ्यावी लागते. अंत्यसंस्कारासाठी आलेल्या दुःखग्रस्त कुटुंबीयांना अशा प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागत असेल, तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. स्मशानभूमी ही सार्वजनिक सुविधा असून ती कोणत्याही राजकीय व्यक्तीची, ठेकेदाराची किंवा खासगी व्यक्तीची मालमत्ता नाही. मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी आलेल्या कुटुंबीयांना कोणाच्याही मध्यस्थीशिवाय तातडीने प्रवेश मिळाला पाहिजे. स्मशानभूमींच्या चाव्या अधिकृत कर्मचाऱ्यांकडेच असाव्यात. प्रवेशाची स्पष्ट व्यवस्था असावी आणि कोणत्याही नागरिकाला अंत्यसंस्कारासाठी अडविले जाणार नाही, याची प्रशासनाने खात्री करावी. स्मशानभूमींच्या जागेची हद्द, ताबा, व्यवस्थापन, ठेकेदार आणि चाव्यांची जबाबदारी यांचीही तपासणी करणे गरजेचे आहे. या ठिकाणांचा राजकीय प्रभाव किंवा मतांचे गणित साधण्यासाठी वापर होत असल्याच्या तक्रारी असतील, तर त्यांचीही निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे.

थोडक्यात पण महत्वाचे



राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेत 'अनेकान्त' च्या मुलींची सुवर्णभरारी

पुणे : दैनिक संध्या

बुलढाणा येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या दैदीप्यमान यशामुळे संपूर्ण परिसरातून या विजयी संघाचे आणि मार्गदर्शकांचे कौतुक होत आहे. राज्यभरातील आठ विभागातून आलेल्या नामांकित संघांना कडवी झुंज देत या मुलींनी अंतिम फेरीत धडक मारली आणि उपविजेतेपदावर आपले नाव कोरले. खेळाडूंची जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम आणि उत्तम सांघिक भावना यामुळेच हे यश संपादन करणे शक्य झाले. अनेकान्त स्कूलच्या विजयात संपूर्ण संघाने उत्कृष्ट ताळमेळ दाखवला. बचाव फळीत (डिफेन्स) शरयु गुळूमकर, माही बेलदार व अनन्या भगत यांनी भिंत बनून प्रतिस्पर्ध्यांचे हल्ले परतवून लावले. मधल्या फळीत (मिडफिल्ड) संख्या मोरे, साक्षी नाळे व पूर्वी रणदिवे यांनी खेळावर नियंत्रण ठेवले. तर आघाडीच्या फळीत (फॉरवर्ड) अनुष्का झगडे, ईश्वरी दळवी, शरयू कोळसे, श्रेया बिचुकले, आदिती बाभळे, स्वरा कानडे, रिद्धी जगताप व पूर्वा बोराडे यांनी वेगवान चढाया करत प्रतिस्पर्धी संघाला बॅकफूटवर ठेवले. या स्पर्धेतील चमकदार कामगिरीच्या जोरावर अनेकान्त इंग्लिशमिडियम स्कूलच्या कु. साक्षी महेंद्र नाळे, कु. शरयू अतुल गुळुमकर आणि कु. माही तात्यासाहेब बेलदार या तिन्ही विद्यार्थिनींची १४ वर्षांखालील महाराष्ट्र संघात (Maharashtra State Team) निवड झाली, त्यांच्या या यशाने शाळेचा आणि बारामतीचा गौरव वाढवला आहे. या ऐतिहासिक यशामागे स्कूलचे क्रीडा शिक्षक राहुल लोखंडे सर यांचे मोलाचे योगदान आहे.

सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमात अध्यादेशाव्दारे सुधारणेस मान्यता

मुंबई : दैनिक संध्या



महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमात अध्यादेशाव्दारे सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम १ मार्च २०१७ पासून अंमलात आहे. या अधिनियमात विद्यापीठाशी निगडीत विविध विषयांकरिता तरतूद करण्यात आली आहे. मात्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात झालेल्या बदलाच्या अनुषंगाने अधिनियमात करण्याची आवश्यकता होती. त्यानुसार अधिनियमातील कलम १३(१२) आणि कलम १००(५)(अ) यामध्ये सुधारणा करण्याच्या अध्यादेशाच्या मसुद्यास मान्यता देण्यात आली. कलम १३(१२) मधील सुधारणेमुळे राज्याच्या कुलपती यांना संबंधित विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या शिफारशीवरून प्र-कुलगुरू यांना हटविता येणार आहे. तर १००(५)(अ) मध्ये विद्यापीठाशी निगडीत बांधकाम व विकसनाचे काम यापुढे व्यवस्थापन परिषदेच्या देखरेखीखाली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करता येतील अशी सुधारणा केली जाणार आहे. या अध्यादेशाच्या प्रारूपात आवश्यक बदल करण्याचे अधिकार विधि व न्याय विभागास देण्यात आले.

एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरणात सुधारणा

मुंबई : दैनिक संध्या



एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. नव्या सुधारणेनुसार यंत्रसामग्रीच्या पुस्तकी किंमतीच्या १० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त यंत्रसामग्री स्थापित केल्यास त्याला विस्तारीकरण समजण्यात येणार आहे. त्याचबरोबर पालघर जिल्ह्याचा समावेश झोन-१ मधील जिल्ह्यांमध्ये करण्याचाही निर्णय घेण्यात आला. राज्याचे नवीन एकात्मिक व शाश्वत धोरण जाहीर झाल्यानंतर त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत वस्त्रोद्योग संघटनांनी मागणी केली होती. वस्त्रोद्योगाच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक त्या सुधारणा मंजूर करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक ती पावले उचलण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार मंत्रिमंडळाने या धोरणात सुधारणा करण्यास मान्यता दिली. नव्या सुधारणेनुसार ज्या वस्त्रोद्योग प्रकल्पांना १ जून, २०२३ पूर्वी बँकेने कर्ज मंजूर केले असेल तसेच स्व-अर्थसहाय्यित प्रकल्पाने यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी अग्रिम दिले असेल, तथापि, उत्पादन नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ च्या कालावधीत सुरु झाले असल्याने वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२३ किंवा एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ यापैकी कोणत्याही एका धोरणांतर्गत लाभ निवडण्याची मुभा देण्यात आली आहे. नवीन धोरणामध्ये विस्तारीकरण करण्यासाठी मागील आर्थिक वर्षीच्या स्थापित यंत्रसामग्रीच्या पुस्तकी किमतीच्या १० टक्के किंवा यापेक्षा जास्त यंत्रसामग्री स्थापित केल्यास त्याला विस्तारीकरण समजण्यात यावे, अशी सुधारणा करण्यात आली आहे.

पालघरला जिल्हा व सत्र न्यायालयाबरोबरच मुख्य दंडाधिकारी न्यायालय होणार

मुंबई : दैनिक संध्या

पालघर जिल्ह्यासाठी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय तसेच मुख्य दंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. याचबरोबर जिल्हा सरकारी वकील कार्यालयाचीही स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली. ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून १ ऑगस्ट, २०१४ रोजी पालघर जिल्हा निर्माण करण्यात आला. या जिल्ह्यात पालघर, वसई, डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा आणि विक्रमगड या तालुक्यांचा समावेश आहे. या अनुषंगाने ठाणे न्यायिक जिल्ह्याचे विभाजन करून पालघर हा नवीन न्यायिक जिल्हा स्थापन करून जिल्हा व सत्र न्यायालय आणि मुख्य दंडाधिकारी न्यायालयाची स्थापन करण्यास उच्च न्यायालयाच्या नवीन न्यायालय स्थापना समितीने मान्यता दिली आहे. यानुसार मंत्रिमंडळाच्या बैठकीत दोन्ही न्यायालयासह जिल्हा सरकारी वकील कार्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयासाठी नव्याने ७९ पदे निर्माण केली जाणार असून इतर न्यायालयाकडून २९ पदे हस्तांतरित केली जातील. त्याचबरोबर ३९ पदांसाठी बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळांच्या सेवा घेतल्या जातील. मुख्य दंडाधिकारी न्यायालयासाठी नव्याने १६ पदे निर्माण केली जातील.

नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांकडून लुटून नेलेल्या शस्त्रांबाबत माहिती देणाऱ्यांना रोख बक्षीस

■ मुंबई (दै. संध्या)



नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांकडून यापूर्वी लुटून नेलेल्या शस्त्रांबाबत माहिती देणाऱ्यांसाठी रोख बक्षीस देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यात शस्त्रांच्या प्रकारानुसार आणि संख्येनुसार रोख बक्षीस देण्यात येणार आहे.

भारत सरकारने देशातील डावी कडवी विचारसरणी तथा नक्षलवाद संपुष्टात आणण्याचा निर्धार केला आहे. डाव्या उग्रवादी नक्षलवादी आणि माओवादी संघटनांचा प्रभाव असलेला रेड कॉरिडॉरचा मनसुबा केंद्र आणि राज्य सरकार यांच्या समन्वयामुळे उधळून लावला गेला आहे. त्यामुळे या रेड कॉरिडॉरच्या पश्चिम सीमेवरील गडचिरोली आणि गोंदिया हे जिल्हे नक्षलमुक्त झाले आहेत. या भागात आता मोठ्या प्रमाणात विकास प्रकल्प राबविले जात आहेत.

दरम्यानच्या काळात माओवादी चळवळींच्या सुरुवातीपासून ते आतापर्यंत माओवाद्यांनी पोलीस स्थानकांवर आणि पोलीस पथकांवर हल्ला करून राज्याच्या सुरक्षा दलाकडील शस्त्रे लूटून नेली आहेत. नक्षलवाद्यांना अटक, त्यांचा बिमोड करण्यासाठी माहिती देणाऱ्यास तसेच सुधारित आत्मसमर्पण योजनेत शस्त्रांसह आत्मसमर्पण केल्यास नियमित बक्षिसांव्यतिरिक्त शस्त्रांच्या प्रकारानुसार अतिरिक्त आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद आहे. पण सुरक्षा दलांकडून लुटून नेलेल्या शस्त्रांबाबत माहिती देऊन, अशी शस्त्रे हस्तगत करण्यासाठी मदत करणाऱ्यांना रोख बक्षीस देण्याची तरतूद नव्हती. त्यामुळे ही बेपत्ता शस्त्रे शोधण्यासाठी रोख बक्षीस देण्याचा प्रस्ताव गृह विभागाने सादर केला. त्यानुसार नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांकडून लुटून नेलेल्या शस्त्रांची तसेच त्यांच्याकडील शस्त्रांबाबत माहिती देणाऱ्यांसाठी रोख बक्षीस देण्यात येणार आहे.स्वयंचलित, अर्धस्वयंचलित, इतर प्रकारची शस्त्रे तसेच दारुगोळा अशा प्रकारांसाठी बक्षिसांची रक्कम निश्चित करण्यात आली आहे. ती शस्त्र प्रकारानुसार सुमारे दीड लाख रुपयांपर्यंत आहे. बक्षिसांची रक्कम मंजूर करण्यासाठी व त्याबाबतची रक्कमेची मर्यादाही निश्चित करण्यात आली आहे.पोलीस अधीक्षकांना दहा लाख रुपयांपर्यंतचे अधिकार आहेत. तर त्यापुढे २५ लाखांपर्यंत गडचिरोली परिक्षेत्रांचे उप महानिरीक्षक, पंचवीसहून अधिक ते पन्नास लाखांपर्यंतच्या बक्षिसासाठी विशेष पोलीस महानिरीक्षक नक्षलविरोधी अभियान यांना आणि ५० लाख रुपये ते एक कोटीपर्यंतच्या बक्षीस रकमेचे अधिकार अपर पोलीस महासंचालक यांच्याकडे असतील.

ऊसतोड महिला कामगारांना साड्या वाटप

■ चाकण (दै. संध्या)



ऊसतोड महिलांच्या कष्टाचा सन्मान व्हावा, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा आणि त्यांना आपुलकीची जाणीव व्हावी, या हेतूने रोटरी जिल्हा ३१३१ च्या वतीने एक साडी तिच्यासाठी या विशेष सामाजिक उपक्रमांतर्गत भीमाशंकर सहकारी साखर कारखाना, पारगाव येथे दोनशे ऊसतोड महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला रोटरी क्लब मंचरचे अध्यक्ष योगेश शिंदे, रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगरचे अध्यक्ष अविनाश कोहिनकर, रोटरी क्लब चाकणचे अध्यक्ष किशोर भोसले, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगरचे माजी अध्यक्ष राजन जांभळे, राहुल वाळुंज, रोटरी क्लब चाकणचे माजी अध्यक्ष भगवान घोडेकर, सुभाष शिंदे आदी उपस्थित होते.

रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगरचे अध्यक्ष अविनाश कोहिनकर यांनी सांगितले की, " रोटरी जिल्हा ३१३१ चे जिल्हा प्रांतपाल नितीन ढमाले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पुणे व रायगड जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता शेतात राबणाऱ्या ऊसतोड महिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून त्यांचा सन्मान करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे." आजपर्यंत या उपक्रमाच्या माध्यमातून तब्बल १० हजार महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले आहे." किशोर भोसले यांनी सांगितले की," रोटरीच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचून त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे."

एक साडी... एक सन्मान... एक आनंदाचा क्षण, या संकल्पनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम केवळ साडी वाटपापुरता मर्यादित नसून, ऊसतोड महिला भगिनींच्या कष्टाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा आणि त्यांच्या सन्मानाला उजाळा देणारा उपक्रम ठरला असल्याचे किशोर भोसले, भगवान घोडेकर व सुभाष शिंदे यांनी सांगितले.

चाकण भागातील उद्योजकांनी साधला आदित्य ठाकरे यांच्याशी संवाद

■ चाकण (दै. संध्या)



चाकण भागातील उद्योजकांनी महाराष्ट्राचे युवा नेतृत्व आदित्य ठाकरे यांची भेट घेऊन संवाद साधला. चाकण औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, प्रलंबित प्रश्न, आजपर्यंत केलेल्या उपाययोजना तसेच प्रशासनाकडून अपेक्षित असलेले सहकार्य याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शिव उद्योग सहकार सेना महासंघाच्या माध्यमातुन आदित्य ठाकरे यांच्याशी संवाद साधण्यात आला. हर्षल नेगिनहाल, उदय भोसले, एहतेशाम पेणवाला व सतीश नायर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नवीदजी मगदूम यांच्या सहकार्याने उद्योजकांच्या प्रश्नांवर विचार मांडण्यात आले. या संवादादरम्यान शिव उद्योगचे खेड तालुका अध्यक्ष निलेश नितनवरे, जिल्हाप्रमुख रामदास धनवटे, आमदार बाबाजी काळे यांचे मार्गदर्शन लाभले. चाकणचे माजी नगराध्यक्ष शेखर घोगरे यांच्या पुढाकारामुळे हा महत्त्वपूर्ण संवाद शक्य झाला असल्याचे उद्योजक प्रशांत तुळवे यांनी सांगितले.

उद्योजकांचे प्रश्न केवळ मांडून न थांबता त्यावर ठोस उपाययोजना, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी काम करणे हीच आमची भूमिका आहे. उद्योजकांच्या हक्कांसाठी, औद्योगिक विकासासाठी आणि स्थानिक तरुणांच्या रोजगार निर्मितीसाठी आपला हा प्रयत्न यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे अखिल भारतीय शिव उद्योग सहकार सेना महासंघाचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रशांत तुळवे यांनी स्पष्ट केले.

आयटी क्षेत्रात कायमस्वरूपी नोकऱ्यांच्या तुलनेत कंत्राटी भरतीत चारपटपेक्षा अधिक वाढ

■ मुंबई (दै. संध्या)



भारताच्या आयटी क्षेत्रात कायमस्वरूपी नोकऱ्यांच्या तुलनेत कंत्राटी आणि प्रकल्पाधारित भरतीचा कल वेगाने वाढत आहे. सीआयईएल एचआरच्या ताज्या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयटी क्षेत्रातील कंत्राटी मनुष्यबळ भरतीमध्ये १०.१ टक्के वाढ नोंदवण्यात आली, तर कायमस्वरूपी तांत्रिक रोजगारामध्ये ही वाढ केवळ २.३ टक्के राहिली. म्हणजेच, कायमस्वरूपी रोजगाराच्या तुलनेत कंत्राटी भरतीचा वाढीचा दर चारपटपेक्षा अधिक आहे.

अहवालानुसार, कंपन्या आता बदलत्या व्यावसायिक गरजा आणि नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी विशेष कौशल्य असलेल्या उमेदवारांची ठरावीक कालावधीसाठी तसेच प्रकल्पांच्या आवश्यकतेनुसार नियुक्ती करत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि मशीन लर्निंगशी संबंधित कौशल्यांच्या मागणीत ८६.५ टक्के, तर सायबर सुरक्षा आणि डिजिटल ट्रस्ट क्षेत्रातील कौशल्यांच्या मागणीत ८१.८ टक्के वाढ झाली आहे. एजंटिक एआय इंजिनिअर्सच्या मागणीत तब्बल २६० टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. मात्र, ही पदे भरण्यासाठी कंपन्यांना सरासरी १० ते १२ आठवड्यांचा कालावधी लागत आहे. तांत्रिक क्षेत्रातील भरतीच्या एकूण मागणीपैकी जवळपास ८० टक्के मागणी अनुभवी व्यावसायिकांसाठी आहे. यामध्ये चार ते आठ वर्षांचा अनुभव असलेल्या उमेदवारांचे प्रमाण सर्वाधिक आहे. दुसरीकडे, सायबर सुरक्षा आणि एआय आधारित इंजिनिअरिंग क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची कमतरता हे कंपन्यांसमोरील मोठे आव्हान बनले आहे.

दिवाळीत एसटीला प्रवाशांची विक्रमी पसंती!

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक : अवघ्या 16 दिवसांत 548 कोटींचे उत्पन्न

■ मुंबई (दै. संध्या)



दिवाळीचा आनंद, सलग सुट्ट्यांची पर्वणी आणि गावी जाण्यासह परतीच्या प्रवासासाठी प्रवाशांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) लालपरीला भरभरून पसंती दिली आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या 16 दिवसांत एसटीने तब्बल 548 कोटी 22 लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले असून, दररोज सरासरी 34 कोटी 25 लाख रुपयांची कमाई केली आहे. विशेष म्हणजे, दिवाळी सणाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच 16 नोव्हेंबर रोजी परतीच्या प्रवाशांच्या प्रचंड गर्दीमुळे एसटीने एकाच दिवसात 46 कोटी 53 लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळवण्याचा नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. एसटीच्या या विक्रमी कामगिरीबद्दल परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी राज्यातील प्रवाशांचे आभार मानले आहेत.

ऑक्टोबर महिन्यात महिला सन्मान योजनेच्या अंमलबजावणीतील सक्तीमुळे एसटीच्या उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम झाला होता. मात्र, नोव्हेंबर महिन्यात दिवाळी सण, सलग सुट्ट्या, प्रवाशांची वाढलेली संख्या आणि महिला सन्मान योजनेच्या अंमलबजावणीत देण्यात आलेली शिथिलता यामुळे एसटीच्या उत्पन्नाला मोठी चालना मिळाली आहे.

यंदाच्या दिवाळी हंगामातील आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे दरवर्षी गर्दीच्या हंगामात आकारली जाणारी हंगामी भाडेवाढ यंदा रद्द करण्यात आली होती. त्यामुळे सणासुदीच्या काळातही तसेच दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांना नेहमीच्याच तिकीट दरात प्रवास करता आला. खासगी वाहतुकीच्या तुलनेत सुरक्षित, विश्वासार्ह आणि किफायतशीर प्रवासाचा पर्याय म्हणून एसटीने पुन्हा एकदा आपली लोकप्रियता सिद्ध केली आहे. प्रवाशांचा विश्वास आणि एसटी कर्मचाऱ्यांचे परिश्रम यांच्या बळावर लालपरीने पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील आपले महत्त्व अधोरेखित केले आहे. दिवाळीतील हा विक्रमी प्रतिसाद म्हणजे एसटीवरील जनतेच्या अढळ विश्वासाची पावतीच ठरली आहे. असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या २४ योजनांसाठी ऑनलाइन अर्ज

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे : महाडीबीटी २.० प्रणालीवर 'महाआयडी' तयार करता येणार

■ मुंबई (दै. संध्या)



राज्यातील सर्व मत्स्यकास्तकार, मच्छीमार, मत्स्यव्यावसायिक आणि मच्छीमार संस्थांनी महाडीबीटी २.० (https://mahadbt2.maharashtra.gov.in/) या प्रणालीवर आधार क्रमांकाद्वारे महाआयडी तयार करून मत्स्यव्यवसाय विभागाच्या विविध २४ योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच विभागाच्या २४ लाभार्थीभिमुख योजनांसाठी महाडीबीटी २.० प्रणालीवर ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याच्या प्रक्रियेचा शुभारंभ केला. त्यामुळे या योजनांसाठी आता महाडीबीटी २.० प्रणालीवर अर्ज करता येणार आहेत.

मत्स्यव्यावसायिकांचे जीवनमान उंचावणे, शाश्वत आर्थिक समृद्धी साधणे, मत्स्यशेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे आणि विशेषतः लहान शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने ९ मार्च २०२६ रोजी 'मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजने'ला मान्यता दिली. या अंतर्गत भूजलाशयीन, निमखारे पाणी आणि सागरी मत्स्यव्यवसायासाठी सहा राज्यस्तरीय, १९ जिल्हास्तरीय आणि तीन जिल्हास्तरीय योजनांमधील सुधारणा अशा एकूण २८ योजनांचा समावेश आहे.

यापैकी चार राज्यस्तरीय, १८ जिल्हास्तरीय आणि दोन जिल्हास्तरीय योजनांमधील सुधारणा अशा एकूण २४ योजनांसाठी ऑनलाइन अर्ज स्वीकारले जाणार आहेत. त्यासाठी योजनांची 'गव्हर्नमेंट प्रोसेस री-इंजिनिअरिंग' (जीपीआर) प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे नागरिकांना योजनांचा लाभ घेण्यासाठी कोणतीही कागदपत्रे ऑफलाइन सादर करावी लागणार नाहीत. विविध ऑनलाइन डेटाबेसचे एकत्रीकरण करून आवश्यक माहिती स्वयंचलितरित्या उपलब्ध केली जाईल. पडताळणीचे टप्पे आणि आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी झाल्याने लाभार्थ्यांना जलद सेवा मिळेल. प्रमाणपत्रे ऑनलाइन उपलब्ध होतील आणि योजनांचे अनुदान लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात ऑनलाइन जमा केले जाईल. मच्छीमारांना देण्यात येणाऱ्या मासेमारी परवाना वितरण सेवेसाठीही जीपीआर तयार करण्यात आला आहे.


योजनांचे सुलभीकरण, अनावश्यक प्रक्रिया कमी करणे, डिजिटल सेवा उपलब्ध करणे आणि मत्स्यव्यवसायातील उत्पादकता व लाभार्थी सेवांचा विस्तार करणे हा या सुधारणांचा उद्देश आहे. महाआयडी तयार करताना किंवा योजनांसाठी अर्ज करताना अडचण आल्यास संबंधित जिल्ह्याच्या सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाशी संपर्क साधावा.

महाडीबीटी २.० प्रणालीसंबंधी मदतीसाठी आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना कक्षाशी कार्यालयीन वेळेत ०२२-३५२१०५६१ किंवा ०२२-३५१५४०४५ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा. पुणे जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, पुणे येथे "मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना सहाय्यता कक्ष" स्थापन करण्यात आला असून तयार करणे किंवा ऑनलाईन अर्ज करताना अडचणी आल्यास संबंधित जिल्ह्याच्या सहाय्यता कक्षाशी संपर्क साधावा.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



टाटा ऑटोकॉम्पने तीन वर्षांत आपला चौथा डेमिंग पुरस्कार पटकावला

पुणे : दैनिक संध्या

गुणवत्तेप्रती असलेल्या कटिबद्धतेमुळे टाटा ऑटोकॉम्प सिस्टम्सने आणखी एक जागतिक टप्पा गाठला आहे. प्रतिष्ठित 'डेमिंग पुरस्कार' मिळवणारी टाटा टोयो रेडिएटर्स लिमिटेड (टीटीआर) ही भारतातील पहिली पॉवरट्रेन कूलिंग सिस्टम्स डिझाइन आणि मॅन्युफॅक्चरिंग कंपनी ठरली आहे. 'युनियन ऑफ जापनीज सायंटिस्ट्स अँड इंजिनियर्स' (जेयूएसई) तर्फे दिला जाणारा डेमिंग पुरस्कार 'टोटल क्वालिटी मॅनेजमेंट' (टीक्यूएम) आणि सातत्यपूर्ण सुधारणा या क्षेत्रातील जगातील सर्वोच्च सन्मानांपैकी एक मानला जातो. नुकताच मिळालेला हा सन्मान म्हणजे गेल्या तीन वर्षांतील टाटा ऑटोकॉम्प सिस्टम्सचा चौथा डेमिंग पुरस्कार आहे. यामुळे उत्पादनातील उत्कृष्टता आणि सातत्यपूर्ण सुधारणांप्रती कंपनीची बांधिलकी अधिक दृढ झाली आहे. यापूर्वी २०२५ मध्ये टाटा ऑटोकॉम्प हेंड्रिकसन सस्पेंशन्स प्रायव्हेट लिमिटेडला (टीएचएसएल) हा पुरस्कार मिळाला होता, तर २०२४ मध्ये टाटा फिकोसा ऑटोमोटिव्ह सिस्टम्स प्रा. लि. आणि टाटा ऑटोकॉम्प सिस्टम्सच्या कंपोझिट्स डिव्हिजनला या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. या यशामुळे जागतिक दर्जाच्या गुणवत्ता निकषांप्रती समूहाची असलेली सातत्यपूर्ण बांधिलकी अधोरेखित होते. या भव्य यशावर प्रतिक्रिया व्यक्त करताना टाटा ऑटोकॉम्प सिस्टम्स लिमिटेडचे व्हाईस-चेअरमन श्री. अरविंद गोयल म्हणाले, "२०१८ मध्ये आमचा 'टोटल क्वालिटी मॅनेजमेंट' (टीक्यूएम) प्रवास सुरू झाल्यापासून टाटा ऑटोकॉम्पच्या चार बिझनेस युनिट्सनी प्रतिष्ठित डेमिंग पुरस्कार जिंकला आहे, ज्यामध्ये टाटा टोयो रेडिएटर्स हे सर्वात नवीन नाव आहे. गुणवत्तेची संस्कृतीच शाश्वत यशाचा पाया रचते, यावर यातून पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. ग्राहकांना सर्वोत्तम अनुभव देण्यावर आमचा नेहमीच भर राहिला आहे. संपूर्ण संस्थेमध्ये टीक्यूएम संस्कृती रुजवत असतानाच आम्ही आमच्या 'टियर ०.५' क्षमता देखील बळकट करत आहोत. यामुळे ओईएम कंपन्यांशी अधिक चांगला समन्वय साधून आधुनिक प्रणाली-आधारित उपाय उपलब्ध करून देणे शक्य होत आहे. परिणामी, आमच्या ग्राहकांसाठी उत्पादनांची वेगवान उपलब्धता, कमीत कमी कालावधीत विकास आणि अधिक विश्वासार्हता सुनिश्चित होत आहे."

विना नोंदणी वाहनाचा ताबा दिल्याप्रकरणी व्यवसाय प्रमाणपत्र ३० दिवसांसाठी निलंबित

पुणे : दैनिक संध्या

वाहनाची नोंदणी होण्यापूर्वीच ग्राहकाला वाहनाचा ताबा दिल्याप्रकरणी वांद्रे येथील मे. नवनीत मोटर्स या वाहन वितरकाचे व्यवसाय प्रमाणपत्र 30 दिवसांसाठी निलंबित करण्यात आले आहे. यासंदर्भातील आदेश परिवहन आयुक्तांनी जारी केले आहेत. परिवहन विभागाच्या चौकशीत मे. नवनीत मोटर्स यांनी 13 ऑक्टोबर 2026 रोजी एमएच 01 एफएम 2211 क्रमांकाचे वाहन नोंदणी होण्यापूर्वीच वाहन मालकाच्या ताब्यात दिल्याचे निदर्शनास आले. या वाहनाचा मोटार वाहन कर 12 ऑक्टोबर रोजी भरण्यात आला होता, तर वाहनाची अधिकृत नोंदणी 16 ऑक्टोबर रोजी करण्यात आली. नियमानुसार वाहनाची नोंदणी झाल्यानंतर त्यावर उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक आहे. मात्र, नोंदणीपूर्वीच वाहनाचा ताबा दिल्याचे चौकशीत स्पष्ट झाले. या प्रकरणी 6 नोव्हेंबर 2026 रोजी संबंधित वाहन वितरकाची सुनावणी घेण्यात आली. त्यानंतर नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी परिवहन आयुक्तांनी संबंधित वितरकाचे व्यवसाय प्रमाणपत्र 30 दिवसांसाठी निलंबित करण्याचे आदेश दिले. महाराष्ट्रात वास्तव्य करणारे काही वाहनधारक राज्याचा मोटार वाहन कर बुडविण्याच्या उद्देशाने इतर राज्यांत वाहनांची नोंदणी करीत असल्याचे परिवहन विभागाच्या निदर्शनास आले आहे. अशा वाहनांची तपासणी करण्यासाठी विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. परराज्यात नोंदणी केलेली वाहने वारंवार महाराष्ट्राच्या रस्त्यांवर वापरताना आढळल्यास संबंधित वाहनांवर जप्तीची कारवाई करण्यात येईल, असा इशारा परिवहन विभागाने दिला आहे. त्यामुळे संबंधित वाहनधारकांनी नियमानुसार आपल्या वाहनांची महाराष्ट्र राज्यात नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन सह परिवहन आयुक्त (आयटी) शैलेश कामत यांनी केले आहे.

शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या आवश्यक अटी शिथिल करणार : कृषीमंत्री दत्तात्रय भरणे



पुणे : दैनिक संध्या

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात कृषीविषयक योजना राबविताना शेतकरी उत्पादक कंपन्या आणि संघटनांना येणाऱ्या अडचणींचा विचार करून शेतकरी हितासाठी या कंपन्यांच्या आवश्यक अटी शिथिल करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. कृषीमंत्री भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोनची आढावा बैठक झाली. या बैठकीत शेतकरी उत्पादक कंपन्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी, पात्रतेचे निकष, अनुदान प्रक्रिया आणि कृषी व्यवसाय घटकांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार देवराव भोंगळे, सचिव परिमल सिंह, स्मार्ट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक प्रदीप चंद्रन,नानाजी कृषी संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प संचालक मीनल करणवाल यांच्यासह विभागातील अधिकारी उपस्थित होते. प्रकल्पांतर्गत कृषी मूल्यसाखळी बळकटीकरण, कृषी व्यवसाय विकास केंद्र आणि वैयक्तिक कृषी उद्योजकता या घटकांवर भर देण्यात आला आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना गोदामे, शीतगृहे, कांदा चाळ, बीज प्रक्रिया केंद्रे, अन्नधान्य प्रक्रिया उद्योग, कृषी अवजारे, पशुखाद्य निर्मिती आणि जैविक निविष्ठा निर्मितीसारखे व्यवसाय उभारण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असल्याचे कृषीमंत्री भरणे यांनी सांगितले. शेडनेट व पॉलीहाऊससाठी अनुदान, शेती सिंचनासाठी इलेक्ट्रॉनिक बिलाची अट, शेळीपालनासाठी खरेदी प्रक्रिया, कृषी अवजारे बँक योजनेत शेतकरी उत्पादक कंपन्या व संघटनांचा समावेश तसेच गोदाम बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाशी संबंधित अटी तपासून आवश्यक सुधारणा कराव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले. शेतकरी उत्पादक संघटनांना केवळ आर्थिक सहाय्य देण्यापुरते मर्यादित न ठेवता त्यांना सक्षम कृषी उद्योजक म्हणून विकसित करण्याची आवश्यकता आहे. योजनांच्या अंमलबजावणीतील अनावश्यक अडथळे दूर करून शेतकऱ्यांना अधिक सुलभतेने लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागांनी सकारात्मक भूमिका घ्यावी. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेतीमालाचे मूल्यवर्धन करणे आणि ग्रामीण भागातील कृषी आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश कृषीमंत्री भरणे यांनी दिले.

फ्लिपकार्टच्या साथीने महिला उद्योजिकांचा प्रगतीचा नवा प्रवास

■ पुणे (दै. संध्या)



भारतातील नोंदणीकृत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांपैकी सुमारे दहापैकी चार उद्योग आता महिलांच्या मालकीचे आहेत. प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या (पीआयबी) आकडेवारीनुसार ऑक्टोबर २०२६ पर्यंत ही संख्या सुमारे ३.६९ कोटी उद्योगांपर्यंत पोहोचली आहे. हे व्यवसाय रोजगार निर्माण करतात, स्थानिक पुरवठा साखळी मजबूत करतात आणि आर्थिक वाढ अधिक ठिकाणी पोहोचवतात. महत्त्वाकांक्षा मोठी असली तरी व्यापक बाजारपेठांमध्ये प्रवेश, विश्वसनीय लॉजिस्टिक्स आणि व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी योग्य पाठिंबा हे एक मोठे परिवर्तन घडवणारे घटक ठरले आहेत.

फ्लिपकार्ट देशभरातील टियर २ आणि टियर ३ शहरांसह महिला उद्योजकांना ग्राहकांशी जोडून ही दरी भरून काढण्यास मदत करत आहे. सुलभ ऑनबोर्डिंग, वेळेवर पेमेंट आणि विक्रेत्यांच्या पाठबळाद्वारे हे मार्केटप्लेस व्यवसायांना स्थानिक बाजारपेठांच्या पलीकडे विस्तार करण्यास सक्षम करते. 'द बिग बिलियन डेज' सारखे कार्यक्रम त्यांची पोहोच आणखी वाढवतात. त्यामुळे उदयोन्मुख आणि प्रस्थापित विक्रेत्यांसाठी संधींची दारे उघडतात.

महिला उद्योजकता दिनानिमित्त त्यांचा प्रवास, त्यांचा दृढनिश्चय आणि भारताच्या उद्योजकतेच्या भविष्यात महिलांच्या नेतृत्वाखालील व्यवसायांचे वाढते योगदान अधोरेखित करतो. माजी शिक्षिका असलेल्या मुक्ता माथूर यांनी २०१५ मध्ये भारतातील ई-कॉमर्स अजून पाय रोवत असताना माफक गुंतवणुकीसह 'बाप्पा असोसिएट्स'ची सुरुवात केली. आता हा एक प्रस्थापित इलेक्ट्रॉनिक्स व्यवसाय आहे. कॅल्क्युलेटर आणि इतर उपकरणांसोबतच घड्याळे ही त्यांची प्रमुख श्रेणी आहे. त्या डिसेंबर २०१५ मध्ये फ्लिपकार्टचा भाग झाल्या आणि तेव्हापासून त्यांनी बाजारपेठेत मोठे बदल पाहिले आहेत. त्यांच्या मते परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता हाच मुख्य आधार राहिला आहे. "बदल अटळ आहे," असे त्या म्हणतात. हाच दृष्टिकोन त्यांच्या सुमारे १७ जणांच्या टीमलाही आकार देतो. त्यातील अनेकजण सात ते नऊ वर्षांपासून त्यांच्यासोबत आहेत.

सोपी लिस्टिंग, वेळेवर पेमेंट, समर्पित अकाउंट मॅनेजमेंट आणि उत्तम रिटर्न हाताळणी अशा महत्त्वाच्या सपोर्टकडे ती लक्ष वेधते. 'द बिग बिलियन डेज' दरम्यानची विक्री मागील वर्षापेक्षा अधिक चांगली झाली आहे. पश्चिम आणि दक्षिण भारतातील ग्राहकांसह ती आता बंगळूरुपासून सुरुवात करून कर्नाटकात प्रवेश करण्याची आणि नवीन उत्पादने व ब्रँड्स जोडण्याची योजना आखत आहे.

त्यांनी सर्वप्रथम २०२३ मध्ये ऑफलाइन माध्यमांतून आणि आपल्या वेबसाइटद्वारे 'मन्स अँड मार्स' बाजारात आणले. परंतु त्या एकट्या ते टिकवू शकल्या नाहीत आणि त्यांनी काम थांबवले. बाजाराचा अधिक स्पष्ट अंदाज आल्यावर त्यांनी जुलै २०२४ मध्ये भागीदारीत ते पुन्हा लाँच केले. सुरतच्या बाहेरील ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी सुमारे आठ महिन्यांपूर्वी त्या फ्लिपकार्टचा भाग झाल्या. आत्मविश्वासाने ब्रँड तयार करण्यासाठी त्यांनी विक्रेत्यांच्या पाठिंब्याला आणि उत्पादनाची पद्धत व मार्केटिंगबाबत मार्गदर्शनाला श्रेय दिले.

चिपळूण बसस्थानकांच्या रखडलेल्या कामांना मिळणार गती

■ चिपळूण (दै. संध्या)



■ आमदार शेखर निकम यांची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट; एमडींना तातडीने कार्यवाहीचे आदेश

चिपळूण शहरातील मध्यवर्ती बसस्थानक आणि शिवाजीनगर बसस्थानकाच्या रखडलेल्या विकासकामांचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. या दोन्ही बसस्थानकांच्या विकासकामांना प्रशासकीय मान्यता मिळूनही निविदा प्रक्रिया रखडल्याने प्रत्यक्ष कामांना सुरुवात झालेली नाही. यामुळे प्रवाशांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत आमदार शेखर निकम यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन दोन्ही बसस्थानकांच्या कामांबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी परिवहन मंत्र्यांनी एसटी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना (एमडी) तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. चिपळूण मध्यवर्ती बसस्थानक हे कोकणातील महत्त्वाचे आणि वर्दळीचे बसस्थानक असून दररोज हजारो प्रवासी या ठिकाणाहून प्रवास करतात. या बसस्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी दोन टप्प्यांत कामाचे नियोजन करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात अंदाजित २.८७ कोटी रुपये निधीतून रस्ते, बाह्य शेड व इतर संरचनात्मक कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. मात्र, दुसऱ्या टप्प्यातील अंदाजित २.३० कोटी रुपयांच्या निधीतून करण्यात येणारी फरशी (टाईल्स), रंगरंगोटी, विद्युत व्यवस्था, सुशोभीकरण तसेच इतर आवश्यक बांधकामांची निविदा प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. प्रशासकीय मान्यता मिळूनही निविदा प्रक्रिया रखडल्याने प्रत्यक्ष कामाला विलंब होत आहे. दुसरीकडे, चिपळूणमधील शिवाजीनगर बसस्थानकाची अवस्थाही चिंताजनक आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर यांसारख्या लांब पल्ल्याच्या एसटी बसेसची ये-जा असलेल्या या बसस्थानकात मूलभूत सुविधांचा अभाव आहे.

महात्मा फुले पेठेतील टिंबर मार्केटमधील आगग्रस्त भागाची महापौर मंजुषा नागपुरे यांच्याकडून पहाटे पाहणी

नुकसानग्रस्त व्यापारी व नागरिकांना सर्वतोपरी मदत करण्याचे महापौरांचे आश्वासन

■ पुणे (दै. संध्या)



महात्मा फुले पेठेतील विजय वल्लभ शाळा व अंगारशाह तकिया परिसरातील टिंबर मार्केटमध्ये मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीच्या पार्श्वभूमीवर पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी पहाटे घटनास्थळी भेट देत परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी अग्निशमन दलाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून आग नियंत्रणात आणण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना, बचावकार्य तसेच झालेल्या नुकसानीची सविस्तर माहिती घेतली. या आगीच्या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी अनेक दुकाने, व्यावसायिक आस्थापना आणि घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक वर्षांच्या मेहनतीतून उभे केलेले व्यवसाय आगीत जळून खाक झाल्याने स्थानिक व्यापारी आणि नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांच्यावर कठीण परिस्थिती ओढवली आहे. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर महापौर मंजुषा नागपुरे यांनी नुकसानग्रस्त व्यापारी व नागरिकांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. या संकटाच्या काळात पुणे महानगरपालिका प्रशासन बाधित नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, नुकसानग्रस्तांना आवश्यक ती मदत व सहकार्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. अनेक वर्षांच्या कष्टातून उभे राहिलेले व्यवसाय एका आगीत उद्ध्वस्त होणे ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. या दुर्घटनेमुळे बाधित झालेल्या व्यापारी बांधवांना आणि नागरिकांना या संकटातून सावरण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत मिळवून देण्यासाठी पुणे महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून निश्चितच प्रयत्न केले जातील.

या कठीण काळात आम्ही सर्वजण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, अशी ग्वाही महापौर मंजुषा नागपुरे यांनी दिली. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत अशा आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही करावी तसेच बाधितांना दिलासा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, यावर महापौरांनी विशेष भर दिला.

फर्ग्युसन कॉलेज रोडवरील अतिक्रमणांवर तातडीने कारवाई

■ पुणे (दै. संध्या)

■ सर्वसाधारण सभा सुरू असतानाच महापौरांचे निर्देश

■ आयुक्त स्वतः रस्त्यावर उतरले, संपूर्ण अतिक्रमण हटवून रस्ता केला अतिक्रमणमुक्त

■ केवळ दिखाऊ कारवाई नको, फर्ग्युसन रोड कायमस्वरूपी अतिक्रमणमुक्त ठेवा – महापौरांचे प्रशासनाला स्पष्ट निर्देश

फर्ग्युसन कॉलेज रोडवरील अतिक्रमणांमुळे नागरिकांना होणारा त्रास आणि वाहतुकीला निर्माण होणारे अडथळे लक्षात घेऊन महापौर मंजुषा नागपुरे यांनी तातडीने हस्तक्षेप करत प्रशासनाला कठोर कारवाईचे निर्देश दिले. पुणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सुरू असतानाच महापौरांनी दिलेल्या आदेशानंतर महापालिका आयुक्तांनी स्वतः फर्ग्युसन कॉलेज रोडवर उपस्थित राहून परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर संबंधित विभागांच्या माध्यमातून तातडीने अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे फर्ग्युसन कॉलेज रोड अतिक्रमणमुक्त करण्यात आला.

फर्ग्युसन कॉलेज रोड हा पुण्यातील अत्यंत महत्त्वाचा व वर्दळीचा रस्ता आहे. या मार्गावरील अतिक्रमणांमुळे पादचारी, वाहनचालक तसेच परिसरातील नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. नागरिकांची गैरसोय दूर करून रस्ते आणि पदपथ मोकळे ठेवण्याच्या दृष्टीने महापौरांनी प्रशासनाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. विशेष म्हणजे, सर्वसाधारण सभा सुरू असतानाच या विषयाची दखल घेऊन महापौरांनी थेट कारवाईचे आदेश दिल्याने प्रशासनानेही तातडीने कार्यवाही केली. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे यांनी स्पष्ट केले की, "फर्ग्युसन कॉलेज रोडवरील अतिक्रमण हटविण्याची ही कारवाई केवळ एक दिवसापुरती किंवा तात्पुरती असता कामा नये. हा रस्ता कायमस्वरूपी अतिक्रमणमुक्त राहिला पाहिजे. यापुढे या ठिकाणी पुन्हा कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही, याची जबाबदारी संबंधित विभागांनी घ्यावी. यासाठी नियमित पाहणी, सातत्यपूर्ण देखरेख आणि आवश्यक ती प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात यावी."

शहरातील सार्वजनिक रस्ते आणि पदपथ नागरिकांच्या वापरासाठी मोकळे असणे आवश्यक आहे. त्यामुळे अतिक्रमण हटविण्याबरोबरच पुन्हा अतिक्रमण होणार नाही, यासाठी कायमस्वरूपी नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करण्यावर महापौरांनी विशेष भर दिला आहे. नागरिकांना अडथळामुक्त रस्ते, मोकळे पदपथ आणि सुरळीत वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणे ही महापालिकेची जबाबदारी असून, पुणे शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

डोंबिवलीत लोकसेवा समितीचा भव्य कोकण महोत्सव

■ डोंबिवली (दै. संध्या)



गेली जवळजवळ 3 दशके सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकसेवा समिती डोंबिवलीचा भव्य कोकण महोत्सव शुक्रवार 20 नोव्हेंबर ते रविवार 29 नोव्हेंबर यादरम्यान सायंकाळी 5 ते 10 या वेळात आयोजित केला आहे. अरुणोदय सोसायटी, चिनार मैदान, महात्मा फुले रोड, डोंबिवली पश्चिम येथे संपन्न होणाऱ्या या कोकण महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद रसिकांना घेता येणार आहे. कोकणातील सुप्रसिद्ध समई नृत्य, रायगड जिल्ह्यातील शक्तीतुरा, मालवण तालुक्यातील दिंडी, ट्रिकसीनयुक्त पारंपरिक दशावतार, सुप्रसिद्ध संगीतकारांची भजने, डबलबाऱ्या, देवादिकांची पालखी, मिरवणूक अशा विविध पारंपरिक कार्यक्रमांचा आनंद रसिकांना लुटता येणार आहे. कोकणातील उत्पादनांची बाजारपेठ, आणि बालदोस्तांसाठी बालनगरी हे या कोकण महोत्सवाचे खास आकर्षण आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव तसेच ज्येष्ठ सभासदांचा सत्कार यावेळी करण्यात येणार आहे. डोंबिवलीकर आमदार तथा भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे या कार्यक्रमाचे उद्घाटन करणार आहेत. सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य असून डोंबिवलीकरांनी दहा दिवस चालणाऱ्या या सांस्कृतिक कार्यक्रमाचा यथेच्छ आनंद घ्यावा, असे आवाहन लोकसेवा समितीचे अध्यक्ष रामचंद्र(बाळा)परब, आणि सचिव चारुदत्त राणे यांनी केले आहे.

दृष्टिहीन बांधवांच्या आयुष्यात दिवाळीचा गोडवा

कृष्णप्रिया फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

■ पुणे (दै. संध्या)



दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह, प्रकाश आणि गोडधोडाची मेजवानी. मात्र, डोळ्यांनी दिवाळीचा लखलखाट पाहता येत नसला, तरी या सणाचा गोडवा अनुभवता यावा आणि आनंदाचे क्षण सर्वांनाच अनुभवता यावेत, या सामाजिक भावनेतून कृष्णप्रिया सोशल वेल्फेअर फाऊंडेशनच्या वतीने दृष्टिहीन बांधवांसाठी दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून दृष्टिहीन समाजघटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा आणि त्यांच्यासोबत सणाचा आनंद वाटून घेण्याचा संवेदनशील प्रयत्न करण्यात आला. सिंहगड रस्त्यावरील पु. ल. देशपांडे उद्यान येथे नुकताच हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा समाजसेविका सौ. कविता सिद्धेश्वर शिंपी-गिरी यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन करण्यात आले होते.

यावेळी दृष्टिहीन बांधवांना दिवाळी फराळाचे वाटप करून त्यांच्यासोबत स्नेहपूर्ण संवाद साधण्यात आला. सण-उत्सव हे केवळ आनंद साजरा करण्याचे माध्यम नसून समाजातील प्रत्येक घटकाला आपलेपणाची जाणीव करून देण्याची संधी असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

दिवाळीच्या काळात सर्वत्र रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी आणि आनंदाचे वातावरण असते. मात्र, समाजातील काही घटकांना या उत्सवाचा आनंद वेगळ्या पद्धतीने अनुभवावा लागतो. अशा वेळी त्यांच्यापर्यंत प्रेम, आपुलकी आणि माणुसकीचा दिवा पोहोचविणे हीच खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी आहे. याच भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे उपस्थित दृष्टिहीन बांधवांना सणाचा आनंद अनुभवता आला. केवळ फराळाचे वाटप न करता त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण घालविण्याला या उपक्रमात विशेष महत्त्व देण्यात आले.

याप्रसंगी राखी रवींद्र रासकर, अफरोज मन्सूरी, असद मुल्ला, सुजीत जगताप, किरण दादासाहेब चुंगे यांच्यासह फाऊंडेशनचे सहकारी कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला. समाजातील गरजू, वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे. दिवाळीचा प्रकाश केवळ घराघरांतच नव्हे, तर माणसांच्या मनामनांत पोहोचला पाहिजे, हा संदेश कृष्णप्रिया सोशल वेल्फेअर फाऊंडेशनच्या या उपक्रमातून अधोरेखित झाला.